# प्रस्तावना आणि विहंगावलोकन

## वर्ष 2024 मध्ये भारत आणि जग

वर्ष 2024 मध्ये भारताने वेगाने विकसित होत असलेल्या जागतिक परिदृश्यात आपले राष्ट्रीय हितसंबंध पुढे नेण्यासाठी जागतिक घडामोडीत सक्रियपणे सहभाग नोंदविला. भारतीय परराष्ट्र धोरणाने चैतन्यशीलता आणि व्यावहारिकतेचं दर्शन घडविलं. ज्यामुळे महत्त्वपूर्ण कामगिरीची नोंद झाली. जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा आणि सद्भावना वाढीस लागली. बहुपक्षीय आणि बहुस्तरीय व्यासपीठांवरील भारताचा सक्रिय पुढाकार आणि नेतृत्व समविचारी भागीदारांसोबत द्विपक्षीय संबंधांना पूरक ठरले.

भारताचे परराष्ट्र धोरण आणि जागतिक राजनयिक मुत्सद्देगिरीला व्यावहारिक उद्दिष्टांकडे नेण्यात परराष्ट्र मंत्रालयाने (MEA) महत्त्वाची भूमिका बजावली.  भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता वाढविण्यात, बहुस्तरीय संस्थांच्या अर्थपूर्ण सुधारणांना चालना देण्यात, ग्लोबल साउथच्या प्राधान्यांना अग्रक्रम देण्यात आणि नियम-आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या चौकटीत आपली सुरक्षा जपण्यात दृढभाव जपला.  या प्रयत्नांमुळे अधिक समान आणि सर्वसमावेशक जागतिक सुशासन चौकटीला आकार देण्यासाठी भारताची वचनबद्धता अधोरेखित झाली.

या वर्षात सातत्यपूर्ण आर्थिक चढउतार, हवामान बदलाचे परिणाम, भू-राजकीय तणाव आणि सामाजिक व्यत्यय यासह जागतिक आरोग्य आणि पर्यावरणीय आघाड्यांवर सातत्यपूर्ण आव्हाने उभी ठाकली. भारत उच्च-स्तरीय चर्चा आणि सहयोगाद्वारे प्रमुख जागतिक आव्हानांना संबोधित करण्यासाठी जागतिक टप्प्यावर सक्रियपणे सहभागी राहिला.  यामध्ये द्विपक्षीय भागीदारी मजबूत करणे आणि UN, G20, G7, क्वाड, SCO आणि BRICS सारख्या उल्लेखनीय प्रादेशिक आणि जागतिक गटांमध्ये सक्रिय सहभाग अंतर्भूत होता.

पूर्वीची G20 अध्यक्षता भूषविली असल्याने भारताने ट्रोइका गट (भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका) अंतर्गत ब्राझीलसोबत काम करणे सुरू ठेवले.  भारताच्या G20 अध्यक्षतेच्या काळात केलेल्या कामावर आधारित, ब्राझीलने 2024 साठी तीन प्राधान्यक्रम अधोरेखित केले. ज्यामध्ये सामाजिक समावेशन, ऊर्जा संक्रमण आणि बहुस्तरीय प्रशासन संस्थांमध्ये सुधारणा यांचा समावेश होता.  पंतप्रधानांनी 18-19 नोव्हेंबर रोजी रिओ दि जानेरो येथे पार पडलेल्या 19व्या G20 शिखर परिषदेत सहभाग नोंदविला. मानवकेंद्रित, रचनात्मक आणि विकासाभिमुख असल्याने विकसित आणि विकसनशील देशांमध्ये पंतप्रधानांच्या हस्तक्षेपाचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले. सप्टेंबर 2023 मध्ये नवी दिल्लीतील G20 शिखर परिषदेत समावेश झाल्यानंतर, आफ्रिकन संघाने स्थायी सदस्य म्हणून सहभाग नोंदविलेली ही पहिलीच G20 शिखर परिषद ठरली.




नोव्हेंबरमध्ये रिओ दि जानेरो येथे नोव्हेंबर 2024 रोजी पार पडलेल्या 19 व्या G-20 शिखर परिषदेत अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जोसेफ बायडेन आणि ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्यासमवेत पंतप्रधान

ऑगस्टमध्ये, भारताने 'शाश्वत भविष्यासाठी सक्षम ग्लोबल साउथ' या मुख्य संकल्पनेच्या अंतर्गत आभासी स्वरुपात 'व्हॉईस ऑफ ग्लोबल साउथ' शिखर परिषदेच्या 3 तिसऱ्या आवृत्तीचे आयोजन केले होते. पंतप्रधानांनी राष्ट्र/शासन प्रमुखांच्या सत्राचे उद्‌घाटन केले आणि ग्लोबल साउथच्या शाश्वत विकासास प्रोत्साहन देण्यासाठी सर्वसमावेशक आकृतीबंध म्हणून काम करण्यासाठी "ग्लोबल डेव्हलपमेंट कॉम्पॅक्ट" प्रस्तावित केले. कॉम्पॅक्ट हे व्यापार, क्षमता निर्माण, तंत्रज्ञान सामायिकरण आणि आर्थिक सहाय्य यावर लक्ष केंद्रित करते आणि ग्लोबल साउथला सक्षम करण्याचे ध्येय बाळगते विकास संतुलित आणि शाश्वत असल्याची खात्री करते. नेत्यांच्या सत्रानंतर दहा मंत्रीस्तरीय सत्रे पार पडली: आरोग्य मंत्री, युवक मंत्री, वाणिज्य/व्यापार मंत्री, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री, अर्थमंत्री, ऊर्जा मंत्री, शिक्षण मंत्री, पर्यावरण मंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांच्या (EAM) अध्यक्षतेखाली परराष्ट्र मंत्र्यांची दोन सत्रे.



या शिखर परिषदेत 123 ग्लोबल साउथ देशातील 173 जागतिक पातळीवर मान्यवर सहभागी झाले होते. ज्यामध्ये 21 राष्ट्र/शासन प्रमुख आणि 34 परराष्ट्र मंत्री यांचा समावेश होता. ऐतिहासिक तिसऱ्यांदा विजय मिळवल्यानंतर आणि नवीन सरकारची शपथ घेतल्यानंतर पंतप्रधानांनी आयोजित केलेली ही पहिली बहुस्तरीय शिखर परिषद होती. नवीन सरकारच्या पहिल्या 100 दिवसांत संपन्न झालेल्या शिखर परिषदेत ग्लोबल साउथच्या सामूहिक विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी भारताची प्रामाणिकता आणि वचनबद्धता आणि ग्लोबल साउथच्या नेत्यांशी आणि देशांशी संवाद साधण्यास पंतप्रधानांनी दिलेले प्राधान्य यामुळे अधोरेखित होते.

जून महिन्याच्या प्रारंभी, पंतप्रधानांनी इटलीमध्ये पार पडलेल्या G7 शिखर परिषदेत सहभाग नोंदविला. जिथे त्यांनी जागतिक पातळीवर प्रमुख नेत्यांशी विचारविनिमय करुन आव्हानांवर चर्चा केली. शिखर परिषदेत, पंतप्रधानांनी तंत्रज्ञानाचा अंगिकार हा मानव-केंद्रित दृष्टिकोनातून करायला हवा यावर भर दिला. सार्वजनिक सेवा पुरवण्यासाठी डिजिटल प्रगतीचा फायदा घेण्याच्या भारताच्या यशावर प्रकाश टाकला. पंतप्रधानांनी "कृत्रिम बुद्धिमत्ता सर्वांसाठी" करिता भारताची वचनबद्धता अधोरेखित केली. जागतिक प्रगती आणि कल्याणाला चालना देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भूमिकेचे समर्थन केले. ग्लोबल साउथच्या समस्यांना अग्रक्रम देण्याच्या विशेषत्वाने अफ्रिका भूमिकेवर भर दिला. आफ्रिकन संघाचे G 20 मध्ये स्थायी सदस्यत्व मिळवण्यात भारताच्या भूमिकेचे स्मरण केले. भारत-इटली धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्याबाबत पंतप्रधानांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी चर्चा केली.

वर्षभरात, भारताने सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी जागतिक समुदायासोबत सक्रियपणे सहकार्य केले आणि दहशतवादविरोधी क्षेत्रात क्षमता-निर्मिती, सर्वोत्तम पद्धती आणि माहितीचे आदान-प्रदान करण्यासाठी भागीदार देशांसोबत काम केले. वर्षभरात, भारताने विविध दहशतवादविरोधी कार्य गटांमध्ये सहभाग नोंदविला. दहशतवादाच्या धोक्याचा सामना करण्यासाठी त्याच्या भागीदारांसोबत, ज्यामध्ये क्वाड समूह आणि फ्रान्स, कझाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांचा समावेश होता. जूनमध्ये सिंगापूर येथे झालेल्या FATF च्या वार्षिक अधिवेशनात FATF (फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स) च्या भारताच्या परस्पर मूल्यांकनावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ज्यामध्ये भारताचा अहवाल अंतिम करण्यात आला आणि FATF च्या वार्षिक अधिवेशनात असा निष्कर्ष काढला की भारताने FATF आवश्यकतांचे उच्च पातळीचे तांत्रिक पालन केले आहे. यावरुन असे दिसून आले की भारताची मनी लाँडरिंग विरोधी, दहशतवादाला वित्तपुरवठा विरोधी आणि प्रसार वित्तपुरवठा विरोधी (CPF) व्यवस्था प्रभावी परिणाम साध्य करत आहे.

भारताने वर्षभरात तीन प्रमुख मानवतावादी सहाय्य आणि आपत्ती सहाय्य (HADR) कार्ये हाती घेऊन आपल्या शेजारी आणि सीमापार संकटांमध्ये विश्वसनीय 'पहिला प्रतिसादक' म्हणून आपली ओळख अधोरेखित केली. नागरी अशांततेच्या पार्श्वभूमीवर हैतीमधून भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी मार्चमध्ये ऑपरेशन इंद्रावती सुरू करण्यात आले. जूनमध्ये, कुवेत मध्ये 45 मृत भारतीय नागरिकांचे पार्थिव मायदेशी परत आणण्यासाठी एक विशेष मानवतावादी विमान वाहतूक ऑपरेशन हाती घेण्यात आले. सप्टेंबर मध्ये, म्यानमारमध्ये यागी वादळामुळे आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन मानवतावादी मदत देण्यासाठी ऑपरेशन सद्भाव सुरू करण्यात आले. या ऑपरेशन्स व्यतिरिक्त,

भारताने वर्षभरात 20 पेक्षा जास्त देशांना HADR सहाय्य प्रदान केले. 2024 मध्ये, भारताने पश्चिम आशियातील संघर्षग्रस्त भागात मानवतावादी मदत देणे सुरू ठेवले. भारताने सीरियाला कर्करोग विरोधी औषधे पुरवली आणि पॅलेस्टाईनच्या लोकांसाठी 30 टन मानवतावादी मदत आणि जीवनरक्षक औषधे पुरवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या मदत आणि कार्य यंत्रणा (UNRWA) सोबत समन्वय साधला. जुलैमध्ये, भारताने ओमानच्या किनाऱ्याजवळ बुडालेल्या कोमोरोसच्या ध्वजांकित जहाज एमटी प्रेस्टिज फाल्कनमधून ओमानी अधिकाऱ्यांसोबत संयुक्त शोध आणि बचाव मोहिमेत आठ भारतीयांसह नऊ कर्मचाऱ्यांची सुटका केली.

या वर्षभरात, भारताने अनेक महत्त्वाचे राजनयिक टप्पे गाठले. भागीदारी देशांसोबतच्या अनेक दशकांच्या द्विपक्षीय संबंधांची वर्षपूर्ती साजरी करण्यात आली. हे टप्पे ऐतिहासिक आणि विकसित होत असलेल्या भागीदारींना जोपासण्यासाठी भारताची सातत्यपूर्ण वचनबद्धता अधोरेखित करतात.




जूनमध्ये इटलीमध्ये जून 2024 रोजी संपन्न झालेल्या G7 शिखर परिषदेच्या सत्रात अन्य जागतिक नेत्यांसह पंतप्रधान

वर्ष 2024 मध्ये, धोरणात्मक तसेच सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीसाठी द्विपक्षीय भागीदारीचा विस्तार करण्यात आला. भारताने सिंगापूर आणि मलेशियासह 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी' च्या स्तरावर संबंध उन्नत केले आहे. स्वतंत्रपणे, कुवेत आणि पोलंड सोबत राजनयिक संबंध 'धोरणात्मक भागीदारी' मध्ये श्रेणी सुधारित करण्यात आले. या घडामोडींमुळे त्यांच्या धोरणात्मक भागीदारीला बळकटी देण्यासाठी भारताचा सक्रिय दृष्टीकोन अधोरेखित झाला.

वर्षभरात, पंतप्रधानांना जागतिक स्तरावरील देशांकडून असंख्य नागरी सन्मान मिळाले. पंतप्रधानांचा मुत्सद्दीपणा आणि आंतरराष्ट्रीय संबंधासाठी दिलेल्या योगदानाचा याद्वारे सन्मान करण्यात आला. मार्च मध्ये, भूतानच्या औपचारिक भेटी दरम्यान त्यांना 'ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो' या सर्वोच्च नागरी सन्मानाने राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचूक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. जुलै मध्ये, 22 व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी औपचारिक रशिया भेटीदरम्यान, त्यांना “द ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यू द अपॉस्टल” पुरस्काराने राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या हस्ते गौरविण्यात आले. द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यात आणि साथीच्या रोगाचा प्रतिकार करण्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांच्या नेतृत्वाची दखल घेत, पंतप्रधानांना "ऑनररी ऑर्डर ऑफ फ्रीडम ऑफ बार्बाडोस" ने सन्मानित करण्यात आले; त्यांना गयानाच्या जॉर्जटाऊन येथे डोमिनिका राष्ट्रकुलच्या अध्यक्ष सिल्व्हानी बर्टन यांनी डोमिनिकाचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार "डोमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर" ने देखील सन्मानित केले. नोव्हेंबर 2024

मध्ये, नायजेरियाने त्यांना "ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ नायजर" हा किताब बहाल केला, तर गयाना आणि कुवेतने त्यांना अनुक्रमे "ऑर्डर ऑफ एक्सलन्स" आणि "द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर" या सर्वोच्च सन्मानांनी सन्मानित केले.



मॉस्को येथे जुलै 2024 मध्ये पार पडलेल्या 22व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेदरम्यान रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी रशियाचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार "द ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यू द अपॉस्टल" प्रदान केला

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) ने 2024 मध्ये नवीन स्वाक्षरी आणि मान्यतेच्या सह आपल्या सदस्यत्वाचा विस्तार केला.  माल्टा (फेब्रुवारी), पॅराग्वे (जून), लेबनॉन (ऑगस्ट) आणि मोल्डोवा (डिसेंबर) यांनी करारावर स्वाक्षरी केली. तर पनामा (मार्च), न्यूझीलंड (ऑगस्ट) आणि अर्मेनिया (नोव्हेंबर) यांनी कराराला मान्यता दिली.  या घडामोडींमुळे सौरऊर्जा विस्तार आणि हवामान बदलाचा सामना करण्यासाठी जागतिक प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठीचा भारताचा पुढाकार अधोरेखित झाला.

अनेक उच्च-स्तरीय द्विपक्षीय भेटींमुळे दीर्घकालीन राजनयिक संबंधाना बळकटी मिळाल्याचे दिसून आले.  माननीय राष्ट्रपतीजी यांनी अल्जेरिया, फिजी, मलावी, मॉरिटानिया, मॉरिशस, न्यूझीलंड आणि तिमोर लेस्टे या देशांना औपचारिक भेटी दिल्या.  अल्जेरिया हा दौरा त्या देशाचा पहिलाच औपचारिक दौरा ठरला. ज्यामध्ये भारत-अल्जेरिया इकॉनॉमिक फोरमचे उद्घाटन समाविष्ट होते. ज्यामुळे द्विपक्षीय संबंधांमध्ये एका नवीन अध्यायाला सुरुवात झाल्याचे मानले गेले.  राष्ट्रपतीजी यांनी फिजी आणि तिमोर लेस्टे या देशांनाही अभूतपूर्व भेटी दिल्या. एखाद्या भारतीय राष्ट्रप्रमुखाने या देशांना भेट देण्याची ही पहिलीच वेळ होती.

तिमोर-लेस्टेच्या भेटी दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा 'द ग्रँड-कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्टे' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन जोसे रामोस-होर्टा यांनी गौरव केला.  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना

फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार, कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी हा ऑगस्ट मध्ये सुवा येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.  या भेटींमुळे प्रदेशांमधील द्विपक्षीय संबंध हे अधिक गतिमान झाले आहेत.



तिमोर-लेस्टे कडून  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा 'द ग्रँड-कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्टे' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. राष्ट्रपती  जोसे रामोस-होर्टा यांनी ऑगस्ट 2024 मध्ये दिली येथे हा पुरस्कार प्रदान केला

इराणचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सय्यद इब्राहिम राईसी आणि इराणचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री डॉ. हुसेन अमीर-अब्दुल्लाहियान यांच्या हेलिकॉप्टर अपघातात झालेल्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी आयोजित अधिकृत समारंभात सहभागी होण्यासाठी माननीय उपराष्ट्रपती मे महिन्यात इराणला गेले होते.

भारताच्या भागीदार देशांसोबतच्या उच्च-स्तरीय प्रतिबद्धता जोपासताना, पंतप्रधानांनी ऑस्ट्रिया, भूतान, ब्राझील, ब्रुनेई, गयाना, इटली, कुवेत, लाओस, नायजेरिया, पोलंड, कतार, रशिया, सिंगापूर, युक्रेन, संयुक्त अरब अमिराती आणि अमेरिका या देशांना भेट देऊन विविध उच्चस्तरीय द्विपक्षीय, बहुपक्षीय आणि बहुस्तरीय कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला.

जुलैमध्ये पंतप्रधानांनी ऑस्ट्रियाला भेट दिली. गेल्या चार दशकातील भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा होता.  ऑगस्ट मध्ये युक्रेनला दिलेली भेट ऐतिहासिक ठरली.  1992 मध्ये उभय देशांमधील राजनयिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच युक्रेन दौरा होता. नोव्हेंबरमध्ये पंतप्रधानांनी नायजेरियाला औपचारिक भेट दिली. गेल्या 17 वर्षातील भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा ठरला.  डिसेंबरमध्ये पंतप्रधानांनी कुवेतला भेट दिली. ही त्यांची पहिलीत कुवेत भेट ठरली. गेल्या 43 वर्षातील भारतीय पंतप्रधानांची पहिली भेट होती.

पंतप्रधानांनी विविध व्हर्च्युअल आणि प्रत्यक्षपणे बैठकीत सहभाग नोंदविला. ज्यामध्ये UN येथील शिखर परिषद, G20 शिखर परिषद, G7 शिखर परिषदेचे विशेष सत्र, क्वाड नेतृत्व शिखर परिषद, BRICS शिखर परिषद, SCO शिखर परिषद आणि व्हाईस ऑफ ग्लोबल शिखर परिषदेची 3 री आवृत्ती.

वर्षभरात EAM यांनी विविध राजनयिक स्तरीय प्रतिबद्धतेसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इराण, इटली, जपान, कझाकिस्तान, कुवेत, लाओ PDR, मलेशिया, मालदीव, मॉरिशस, नेपाळ, नायजेरिया, पाकिस्तान, फिलिपिन्स, कतार, कोरिया, सौदी अरेबिया, सिंगापूर, श्रीलंका, स्वित्झर्लंड, उगांडा, अरब अमिरात, अमेरिका या देशांना भेटी दिल्या.

जानेवारीमध्ये, EAM यांनी इराणला भेट दिली. चाबहार बंदराचा विकास आणि संचलन यावर चर्चा करण्यासाठी तत्कालीन परराष्ट्र मंत्री डॉ. हुसेन अमीर-अब्दुल्लाहियान यांची भेट घेतली. त्यांनी नेपाळचा देखील दौरा केला. जिथे त्यांनी राष्ट्रपती रामचंद्र पौडेल आणि तत्कालीन पंतप्रधान पुष्पकमल दहल 'प्रचंड' यांची भेट घेतली आणि काठमांडूमध्ये तत्कालीन नेपाळचे परराष्ट्र मंत्री श्री. एन.पी. सौद यांच्यासोबत झालेल्या 7व्या भारत-नेपाळ संयुक्त आयोगाच्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषवले. EAM यांनी पहिल्यांदाच नायजेरियाला भेट दिली. परराष्ट्र मंत्री युसूफ तुग्गर यांच्या समवेत 6व्या भारत-नायजेरिया संयुक्त आयोगाच्या बैठकीचे सह-अध्यक्षता भूषविली. समान महिन्यात, त्यांनी कंपाला, उगांडा येथे 19 व्या अलिप्ततावादी चळवळ (NAM) शिखर परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. मार्च मध्ये, EAM यांनी जपानचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी पंतप्रधान फुमिओ किशिदा यांची भेट घेतली. 16 व्या भारत-जपान धोरणात्मक संवादात परराष्ट्र मंत्री योको कामिकावा यांच्या सोबत सह-अध्यक्षता भूषविली. द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी त्यांनी मलेशियाला भेट दिली, पंतप्रधान दातो सेरी अनवर बिन इब्राहिम आणि परराष्ट्र मंत्री दातो सेरी उतमा हाजी मोहम्मद बिन हाजी हसन यांची भेट घेतली. त्यानंतरच्या महिन्यात फिलिपिन्सला भेट दिली. भेटीदरम्यान राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड आर. मार्कोस ज्युनियर आणि परराष्ट्र मंत्री एनरिक ए. मनालो यांच्या सोबतच्या चर्चेत राजकीय, आर्थिक, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्र विषयक आदान-प्रदान केले. EAM यांनी दक्षिण अफ्रिकेला देखील भेट दिली. 10व्या भारत–ROK संयुक्त आयोग बैठकीची परराष्ट्र मंत्री चो ताई-युल यांच्या सोबत सह-अध्यक्षता भूषविली. सिंगापूर मध्ये त्यांनी पंतप्रधान ली सिएन लूंग आणि उप-पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांची भेट घेतली. तसेच त्यांचे समपदस्थ विवियन बालकृष्णन यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली आणि फिनटेक, डिजिटलायझेशन आणि हरित अर्थव्यवस्थेत द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर चर्चा केली.

जून मध्ये EAM यांनी श्रीलंकेला भेट दिली. या दौऱ्याच्या दरम्यान राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, पंतप्रधान दिनेश गुणवर्धेने आणि परराष्ट्र मंत्री एम.यू.ए अली साबरी यांची भेट घेतली. भारताच्या नागरिक केंद्रित विकास सहकार्याला बळकटी देण्यासाठी, EAM आणि राष्ट्राध्यक्ष विक्रमसिंघे यांनी संयुक्तपणे मॉडेल व्हिलेज गृहनिर्माण प्रकल्पाच्या अंतर्गत कोलंबो आणि त्रिंकोमाली येथे 48 घरे आणि भारतीय गृह प्रकल्प अंतर्गत कँडी, मटाले आणि नुवारा एलिया येथे फेज III अंतर्गत 106 घरांचे लोकार्पण केले. 6 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या भारतीय अनुदान द्वारे स्थापित सागरी शोध आणि बचाव कार्यांसाठी प्रमुख केंद्र असलेल्या सागरी बचाव समन्वय केंद्राचे (MRCC) आभासी पद्धतीने कार्यान्वित केले. परराष्ट्र मंत्री यांनी श्रीलंकेच्या बंदरे, नौवहन आणि विमान वाहतूक, कृषी आणि रोपण उद्योग आणि वीज आणि ऊर्जा मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा केली. त्याच महिन्याच्या अखेरीस, त्यांनी UAE येथे भेट

दिली आणि भारत-UAE व्यापक सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आढावा घेण्यासाठी परराष्ट्र मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान यांच्याशी चर्चा केली.  जुलैमध्ये, परराष्ट्रमंत्री भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व अस्थाना येथे 24व्या SCO शिखर परिषदेसाठी केले.  मॉरिशस भेटीदरम्यान त्यांनी तत्कालीन पंतप्रधान प्रविंद कुमार जगन्नाथ यांची भेट घेतली आणि द्विपक्षीय संबंध विस्ताराच्या मार्गावर चर्चा केली.  ऑगस्ट मध्ये EAM यांनी कुवेतचा दौरा केला. कुवेतचे युवराज महामहिम शेख सबाह अल-खालिद अल-हमद अल-मुबारक अल-सबा, पंतप्रधान महामहिम शेख अहमद अल-अब्दुल्ला अल-अहमद अल-सबा आणि परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला अली अल-याह्या यांची भेट घेतली. द्विपक्षीय संबंध बळकट करण्याच्या दिशेने वार्तालाप केला.  त्यानंतर त्यांनी मालदीवचा दौरा केला. त्यांनी राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुईझ्झू आणि परराष्ट्र मंत्री मूसा जमीर यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांच्या समवेत भारताच्या सवलतीच्या कर्जातून उभारलेल्या विविध 28 द्वीपकल्पावरील विकास प्रकल्पांचे लोकार्पण केले.



सप्टेंबर 2024 मध्ये, रियाध येथे पार पडलेल्या पहिल्या भारत-GCC संयुक्त मंत्रीस्तरीय धोरणात्मक संवाद बैठकीच्या उद्‌घाटन सत्राचे सह-अध्यक्षपद परराष्ट्रमंत्री यांनी भूषविले

सप्टेंबर मध्ये, EAM यांनी जर्मनीला भेट दिली. चॅन्सेलर ओलाफ शुल्झ आणि परराष्ट्र मंत्री ॲनालेना बेरबॉक यांची भेट घेतली.  त्यानंतर ते जिनिव्हा येथे गेले. जिथे त्यांनी स्विस परराष्ट्र मंत्री इग्नाझिओ कॅसिस यांची भेट घेऊन युरोपियन मुक्त व्यापार संघटना (EFTA) राष्ट्रांसोबत भारताच्या व्यापार संबंधांवर चर्चा केली आणि जिनिव्हा येथील भारताच्या स्थायी मिशनच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन केले.  त्याच महिन्याच्या शेवटी, त्यांनी वॉशिंग्टन D.C ला भेट दिली. तत्कालीन परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन, तत्कालीन वाणिज्य सचिव जीना रायमोंडो, तत्कालीन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (NSA) जेक सुलिव्हन आणि इतर वरिष्ठ अमेरिकन अधिकाऱ्यांशी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर चर्चा केली. ऑक्टोबर मध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी ऑस्ट्रेलियाचा दौरा केला. पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि अन्य प्रमुख राजकीय नेत्यांची भेट घेतली.  परराष्ट्र मंत्रालयाच्या 15व्या फ्रेमवर्क डायलॉग अंतर्गत त्यांनी परराष्ट्र मंत्री पेन्नी वाँग यांच्या समवेत सह-अध्यक्षता भूषविली आणि ब्रिस्बेन येथे भारताच्या महावाणिज्य दूतावासाचे उद्‌घाटन केले.  नोव्हेंबर मध्ये, इटली येथे पार पडलेल्या G7 परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला

हजेरी लावली. तसेच MED भूमध्यसागरीय संवादाच्या रोम येथे पार पडलेल्या 10व्या आवृत्तीत सहभागी झाले.  इटलीमध्ये, EAM यांनी इटली आणि G 7 मधील इतर सहभागी देशांमधील आपल्या समपदस्थांसोबत चर्चा केली.  डिसेंबर मध्ये, EAM यांनी कतार आणि बहरीनचा दौरा केला.  कतार मध्ये, त्यांनी 22 व्या  दोहा फोरमला हजेरी लावली आणि पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुलरहमान अल थानी यांच्यासोबत संवाद साधला.  बहरीन मध्ये त्यांनी परराष्ट्र मंत्री डॉ. अब्दुलतीफ बिन रशीद अल झायनी यांच्यासह 4व्या भारत-बहरीन उच्च संयुक्त आयोग (HJC) बैठकीची सह-अध्यक्षता भूषविली.  डिसेंबर मध्ये, परराष्ट्रमंत्री आणि परराष्ट्र सचिवांनी अमेरिकेला भेट दिली. जिथे त्यांनी तत्कालीन NSA सुलिव्हन, तत्कालीन परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन आणि NSA पदासाठी निर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे उमेदवार मायकल वॉल्ट्झ यांच्यासह प्रमुख वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली.

वर्षभरात EAM यांनी विविध बहुपक्षीय आणि बहुस्तरीय बैठकीत सहभाग नोंदविला. ज्यामध्ये 7 वी इंडियन ओशन कॉन्फरन्स (ऑस्ट्रेलिया);  SCO परिषद प्रमुखांची 24वी बैठक (कझाकिस्तान); क्वाड परराष्ट्र मंत्री बैठक (जपान); ASEAN फ्रेमवर्क अंतर्गत परराष्ट्र मंत्री बैठक, प्रामुख्यानं आशियान-भारत पूर्व आशिया शिखर परिषद आणि आशिया रिजनल फोरम (व्हिएंटियाने, लाओ पीडीआर); G20 परराष्ट्र मंत्री बैठक आणि 79वी UNGA उच्च-स्तरीय सत्र (न्यूयॉर्क); धोरणात्मक संवादासाठी भारत-GCC मंत्रीस्तरीय बैठक (सौदी अरेबिया) आणि SCO परिषद प्रमुखांची 23 वी बैठक (पाकिस्तान).

फेब्रुवारीमध्ये, परराष्ट्रमंत्री यांनी पर्थ येथे झालेल्या 7व्या हिंद महासागर परिषदेला संबोधित केले. ज्यामध्ये प्रादेशिक सहकार्यावर भर देण्यात आला.  जुलै मध्ये, EAM यांनी अस्ताना येथील 24 व्या SCO शिखर परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. मागील कार्याचा आढावा घेण्यात. बहुस्तरीय सहकार्यावर विचारविनिमय करण्यात आला.  त्यानंतर त्यांनी टोकियो मधील क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला हजेरी लावली.  इंडो-पॅसिफिक आणि क्वाड उपक्रमांवर बैठकीत विचारविनिमय करण्यात आला.  सप्टेंबरमध्ये, परराष्ट्र मंत्री न्यूयॉर्कमध्ये ब्राझीलच्या 2ऱ्या G20 परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी झाले होते, ज्यामध्ये संयुक्त राष्ट्रांची पुनर्रचना, आर्थिक संरचना आणि व्यापार प्रणालींसह जागतिक प्रशासन सुधारणांचा पुरस्कार करण्यात आला होता.  त्यांनी 79व्या संयुक्त राष्ट्र महासभेत भारताच्या वतीने निवेदन सादर केले. रियाध येथे झालेल्या भारत-GCC संयुक्त मंत्रिस्तरीय बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषविले. ज्यामुळे आखाती राष्ट्रांसोबतच्या धोरणात्मक संवादाला बळकटी मिळाली. ऑक्टोबरमध्ये, परराष्ट्रमंत्री यांनी इस्लामाबादमध्ये झालेल्या 23 व्या SCO सरकार प्रमुखांच्या परिषदेत भारताचे निवेदन मांडले. ज्यामध्ये बहुआयामी सहकार्य, संतुलित वाढ आणि प्रादेशिक स्थिरतेवर भर देण्यात आला.

वर्षभरात, परराष्ट्र मंत्री यांनी नवी दिल्ली येथे फ्रान्स, ग्रीस, भूतान, युक्रेन, मालदीव, बांगलादेश, श्रीलंका, मलेशिया, युएई, जमैका, जर्मनी आणि थायलंडच्या परराष्ट्र मंत्र्यांचे स्वागत केले.  जुलैमध्ये नवी दिल्ली येथे पार पडलेल्या 2 ऱ्या BIMSTEC परराष्ट्र मंत्र्यांच्या संमेलनासाठी त्यांनी BIMSTEC समपदस्थांचे स्वागत केले. संरक्षण मंत्र्यांसह 3 ऱ्या भारत-जपान 2+2 मंत्रिस्तरीय बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषवले होते.

मंत्रालयाचे राज्यमंत्र्यांनी (MoS) विविध भागीदार देशांशी संपर्क साधला. ज्यामुळे भारताच्या जागतिक कक्षा रुंदावण्यास मोलाची मदत झाली.  राज्यमंत्री (श्री. व्ही.मुरलीधरन) यांनी 3ऱ्या 77 गटाच्या साऊथ

समिट मध्ये सहभागासाठी आणि G20 परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत भाग घेण्यासाठी उगांडा (जानेवारी) आणि ब्राझील (फेब्रुवारी) देशांना भेटी दिल्या.

नव्याने गठित भारत सरकारने पदभार स्विकारल्यानंतर राज्यमंत्री (श्री. कीर्ती वर्धन सिंह) यांनी कुवेत (जून), नॉर्वे (ऑगस्ट), आर्मेनिया (सप्टेंबर), मलेशिया (सप्टेंबर), कतार (ऑक्टोबर), कोलंबिया (ऑक्टोबर-नोव्हेंबर), झांबिया (नोव्हेंबर) आणि अझरबैजान (नोव्हेंबर) या देशांना भेटी दिल्या.

राज्यमंत्री (श्री पवित्रा मार्गेरिटा) यांच्या वर्षभरातील भेटी : डोमिनिकन रिपब्लिक (ऑगस्ट), कतार (ऑगस्ट); ग्वाटेमाला (ऑगस्ट), एल साल्वाडोर (ऑगस्ट), पनामा (ऑगस्ट), त्रिनिदाद आणि टोबॅगो (ऑगस्ट), मेक्सिको, ग्रेनेडा, बार्बाडोस, अँटिग्वा आणि बार्बुडा (सप्टेंबर-ऑक्टोबर), आणि इंडोनेशिया (ऑक्टोबर).

या भेटींचे उद्दिष्ट राजकीय आणि आर्थिक सहकार्य, सांस्कृतिक देवाणघेवाण, व्यापार आणि आरोग्य क्षेत्रातील सहकार्य यासह विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य विस्तार करणे आणि परदेशस्थ भारतीयांशी संपर्क साधणे हे होते.

वर्षभरात भारताने विविध उच्च-स्तरीय शिष्टमंडळांचे स्वागत केले. ज्यामध्ये सरकार/शासन प्रमुख/परराष्ट्र मंत्री आणि अन्य उच्च-पदस्थ मान्यवरांचा समावेश होता. भारताने बांगलादेश, भूतान, डोमिनिका, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, जमैका, कुवेत, मालदीव, मलेशिया, मोल्दोव्हा, स्पेन, श्रीलंका, युक्रेन, संयुक्त अरब अमिराती, व्हेनेझुएला आणि व्हिएतनाम येथील राजनयिक प्रतिनिधी मंडळांचे स्वागत केले.

वर्ष 2024 मध्ये भारताची 35 देशांसह परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (FOC) पार पडली. FOC ही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची भागीदार देशांच्या परराष्ट्र मंत्रालयांच्या समवेत संवादासाठी एक संस्थात्मक यंत्रणा आहे. वर्षभरात पार पडलेल्या FOC पुढीलप्रमाणे : पोर्तुगाल (जानेवारी) ; जपान (फेब्रुवारी); फ्रान्स (मार्च); कोटे डी'आयव्होर (मार्च), काबो वर्दे (मार्च); मॉरिटानिया (मार्च); लक्झेंबर्ग (एप्रिल); बेल्जियम (एप्रिल); काँगो (एप्रिल); क्रोएशिया (एप्रिल); नेदरलँड्स (मे); स्वीडन (मे); नॉर्वे (मे); इरिट्रिया (मे); यूके (मे); बेनिन (जून); टोगो (जून); जर्मनी (जुलै); कुवेत (जुलै); झिम्बाब्वे (ऑगस्ट); झांबिया (ऑगस्ट); इस्रायल (ऑगस्ट); अर्जेंटिना (सप्टेंबर); उरुग्वे (सप्टेंबर); इंडोनेशिया (सप्टेंबर); मोल्दोव्हा (ऑक्टोबर); कोलंबिया (ऑक्टोबर); गिनी (ऑक्टोबर); कतार (ऑक्टोबर); मॉन्टेनेग्रो (ऑक्टोबर); सायप्रस (नोव्हेंबर); बोस्निया आणि हर्जेगोविना (नोव्हेंबर); सीरिया (नोव्हेंबर); रवांडा (डिसेंबर); आणि लायबेरिया (डिसेंबर).

हे संबंध भारताचे हितसंबंध पुढे नेण्यासाठी आणि देशांसोबत मजबूत द्विपक्षीय संबंध आणि सहकार्य वाढवण्यासाठी सततच्या राजनैतिक प्रयत्नांना अधोरेखित करतात.

आपल्या 'नेबरहूड फर्स्ट' धोरणाच्या अंतर्गत, भारताने त्याच्या जवळच्या शेजारील देशांसोबत कनेक्टिव्हिटी आणि विकास भागीदारी वाढविण्याचा प्रयत्न केला. भारताच्या शेजारच्या प्रमुख भागीदारांपर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, जूनमध्ये नवीन सरकारच्या शपथविधी समारंभासाठी अनेक नेत्यांना आमंत्रित करण्यात आले होते. शेख हसीना (बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधान), अहमद आफिफ (उप-राष्ट्रपती सेशेल्स), प्रविंद कुमार जगन्नाथ (तत्कालीन पंतप्रधान

मॉरिशस) , डॉ. मोहम्मद मुइझ्झू (अध्यक्ष, मालदीव), रानिल विक्रमसिंघे (तत्कालीन अध्यक्ष श्रीलंका), दाशो त्शेरिंग तोबगे (पंतप्रधान भूतान) आणि पुष्प कमल दहल 'प्रचंड' (तत्कालीन पंतप्रधान, नेपाळ) यांनी या समारंभाला उपस्थिती लावली.

भारताचा अफगाणिस्तान प्रतीचा दृष्टिकोन ऐतिहासिक संबंधांवर, नागरिक परस्पर मैत्रीपूर्ण संबंधावर आणि संबंधित संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांवर आधारित आहे. 2021 पासून, भारताने 50, 000 मेट्रिक टन गहू, 300 टन वैद्यकीय साहित्य, 28 टन मदत आणि 40, 000 लिटर मॅलेथिऑन (कीटकनाशक) यासह महत्त्वपूर्ण मानवतावादी मदत पुरवली आहे. युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्स अँड क्राईम (UNODC) सह सहयोग करून, भारताने असुरक्षित लोकसंख्येला, विशेषत: लक्ष्यित महिला घटकाला आवश्यक कल्याणकारी वस्तू वितरित केल्या. इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (ICCR) ने अफगाण विद्यार्थ्यांना 2,000 ऑनलाइन शिष्यवृत्ती देऊ केली, ज्यामध्ये जवळजवळ 600 महिलांना शिष्यवृत्ती देण्यात आली. चालू असलेल्या मानवतावादी मदतीसाठी एक तांत्रिक पथक काबूल मध्ये स्थायी स्वरुपात तैनात करण्यात आले.

भारत आणि बांगलादेशमध्ये इतिहास, भाषा, संस्कृती आणि यासारखे अनेक समानतेचे बंध आहेत. गेल्या काही वर्षांत राजकीय आणि सुरक्षा सहकार्य, व्यापार आणि आर्थिक संबंध, विकास भागीदारी, सांस्कृतिक आणि नागरिक परस्पर आदान-प्रदान अशा विविध क्षेत्रात सहकार्याचा समावेश करण्यासाठी हे संबंध विकसित झाले आहेत. दक्षिण आशियातील बांगलादेश हा भारताचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे आणि भारत हे आशियातील बांगलादेश साठी सर्वात मोठं निर्यात स्थान बनले आहे.

जूनमध्ये, बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांनी नवी दिल्ली येथे पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाच्या शपथविधी समारंभाला हजेरी लावली होती. जुलै-ऑगस्ट मधील बांगलादेशातील घडामोडींनंतर, भारताने मुख्य सल्लागार प्रा. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेशातील अंतरिम सरकार सोबत सातत्यपूर्ण संपर्क ठेवला. मुख्य सल्लागार युनूस यांचे अभिनंदन करणारे पंतप्रधान हे जागतिक पातळीवरील पहिले नेते ठरले. पंतप्रधानांनी युनूस यांना 17 ऑगस्ट रोजी पार पडलेल्या 3 ऱ्या व्हॉइस ऑफ ग्लोबल साउथ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले होते. सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्कमध्ये पार पडलेल्या 79व्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या वेळी EAM यांनी परराष्ट्र व्यवहार सल्लागार तौहिद हुसेन यांची भेट घेतली होती. डिसेंबर मध्ये, परराष्ट्र सचिव ढाका दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी बांगलादेशचे मुख्य सल्लागार आणि परराष्ट्र व्यवहार सल्लागारांची भेट घेतली. या संवादादरम्यान लोकशाही, स्थिर, शांततापूर्ण, प्रगतीशील आणि सर्वसमावेशक बांग्लादेशसाठी भारताचे समर्थन स्पष्ट करण्यात आले होते.

बांग्लादेश हा आजमितिला भारताचा सर्वात मोठा विकास भागीदार आहे. रस्ते, रेल्वे, जहाजबांधणी आणि बंदरे यासह विविध क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भारताने गेल्या आठ वर्षांत बांगलादेशला सुमारे USD 8 अब्ज रुपयांचे तीन सवलतीची कर्जे (LOCs) दिली आहेत. याव्यतिरिक्त, उच्च प्रभाव समुदाय विकास प्रकल्प (HICDPs) हे बांगलादेशमध्ये भारताच्या विकास मदतीचा एक सक्रिय आधारस्तंभ आहेत. तसेच विद्यार्थी वसतिगृहे, शैक्षणिक इमारती, कौशल्य विकास आणि प्रशिक्षण संस्था, सांस्कृतिक केंद्रे, अनाथाश्रम आणि सामान्य सांस्कृतिक वारशाचे पुनर्संचयित करणं या बाबींचा अंतर्भाव होतो.

वर्षभरात अनेक विकास प्रकल्प पूर्णत्वास पोहोचले. 2023 मध्ये खुलना-मंगला पोर्ट रेल्वे मार्ग यशस्वीरित्या पूर्ण झाला. नोव्हेंबर 2024 मध्ये अखौरा-आगरतळा क्रॉस बॉर्डर रेल्वे लिंक प्रकल्प पूर्ण करण्यात आला. ईशान्य भारत हा बांगलादेशासोबत जोडला गेल्यामुळे हा अत्यंत महत्वाचा प्रकल्प ठरला आणि त्यामुळे या प्रदेशात रेल्वे-कनेक्टिव्हिटी वाढली.

भारत आणि भूतान यांमध्ये मैत्रीपूर्ण द्विपक्षीय संबंध राहिले आहेत. अनोखे नाते विश्वास, सद्भावना आणि परस्पर विश्वास यावर आधारित राहिले आहे. पंतप्रधानांचा भूतान दौरा, भूतानचे राजे यांचा अधिकृत भारत दौरा, भूतानच्या पंतप्रधानांच्या अधिकृत भारत भेटी आणि इतर मंत्री स्तरीय भेटींसह 2024 मध्ये अनेक उच्चस्तरीय आदान-प्रदान सह सर्व क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंधांमध्ये स्थिर प्रगती दिसून आली. भारताने भूतानला त्यांच्या 13व्या पंचवार्षिक योजनेसाठी (2024-2029) मदत स्वरुप दुप्पट केल्याने भूतान सोबत विकास सहकार्य दृढ झाले. भारताच्या मदतीने भूतान मध्ये निर्माणाधीन जलविद्युत प्रकल्पांमध्ये प्रगती दिसून आली. पुनतसांगछू II जलविद्युत प्रकल्प पूर्णत्वाच्या जवळ पोहोचला आहे. सप्टेंबरमध्ये वाणिज्य सचिव स्तरावरील चर्चेदरम्यान अनेक प्रमुख निर्णय घेतल्यामुळे व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढत राहिले. आसाम मधील दरंगा येथे इमिग्रेशन चेकपोस्ट उघडणे आणि रेल्वे लिंक्स स्थापन करण्याच्या प्रगतीमुळे सीमापार कनेक्टिव्हिटी उपक्रमांना सकारात्मक गती मिळाली.




भारत सरकारच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या 'ग्याल्ट्सुएन जेत्सन पेमा वांगचुक मदर अँड चाइल्ड हॉस्पिटल' या अत्याधुनिक रुग्णालयाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे यांनी थिम्पू येथे मार्च 2024 रोजी केले.

भारत सरकारचा अर्थ पुरवठा सहाय्यित प्रमुख विकास प्रकल्पांमध्ये समावेश असलेल्या 'ग्याल्ट्सुएन जेत्सन पेमा वांगचुक मदर अँड चाइल्ड हॉस्पिटल' उभारणी मार्च मध्ये पूर्ण झाली. 150 खाटांचे रुग्णालय आहे. बालरोग, स्त्रीरोग निदान आणि प्रसूती सुविधा, अनेस्थेसियोलॉजी, शस्त्रक्रिया विभाग,

नवजात बालकांसाठीचा अतिदक्षता विभाग आणि बालरोग अतिदक्षता विभाग अशा अत्याधुनिक सुविधा या रूग्णालयात उपलब्ध झाल्या आहेत.

मालदीव हा एक सागरी शेजारी आहे. ज्याच्याशी भारताचे प्राचीन काळापासून वांशिक, भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यावसायिक संबंध आहेत. हिंद महासागर प्रदेश (IOR) ची सुरक्षा आणि सुरक्षा राखण्यात दोन्ही राष्ट्रे महत्त्वाची भूमिका बजावतात आणि भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' धोरणात आणि 'क्षेत्रातील सर्वांसाठी सुरक्षा आणि विकास' (SAGAR) सिद्धांतात मालदीवला विशेष स्थान आहे.

मालदीव सोबतचे द्विपक्षीय सहकार्य स्वाभाविकपणे सागरी सुरक्षा, संपर्क, नागरिक परस्पर आदान-प्रदान आणि सार्वजनिक बांधकाम पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विकासावर केंद्रित आहे. ऑगस्ट मध्ये, EAM यांनी मालदीवला भेट दिली. या भेटी दरम्यान राष्ट्राध्यक्ष, परराष्ट्र मंत्री आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. या भेटीदरम्यान, परराष्ट्रमंत्री यांनी अड्डू पुनर्प्राप्ती आणि किनारा संरक्षण प्रकल्प आणि अड्डू वळसा लिंक ब्रिज प्रकल्पाचे उद्घाटन केले, हे दोन्ही ग्रेटर माले कनेक्टिव्हिटी प्रकल्प (GMCP) ला भारताच्या मदतीचा भाग आहेत. याव्यतिरिक्त, परराष्ट्र मंत्री आणि मालदीवच्या परराष्ट्र मंत्र्यांनी संयुक्तपणे सहा HICDPs सह 28 बेटांवर भारताच्या लाइन ऑफ क्रेडिट (LOC) द्वारे समर्थित पाणी आणि सांडपाणी नेटवर्क प्रकल्पाचे उद्घाटन केले. भारतात प्रशिक्षणाद्वारे 1,000 मालदीवच्या नागरी सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी क्षमता निर्माण करण्यासाठी सामंजस्य करारांची देवाणघेवाण करण्यात आली आणि मालदीवमध्ये युनिफाइड पेमेंट इंटरफेस (UPI) प्रणाली सुरू करण्यात आली.

ऑक्टोबरमध्ये, मालदीवच्या राष्ट्रपतींनी भारताचा औपचारिक दौरा केला आणि माननीय राष्ट्रपती आणि पंतप्रधानांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, पंतप्रधान आणि राष्ट्रपती मुइझ्झू यांनी सर्वसमावेशक आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागीदारी' साठी भारत-मालदीव दृष्टिकोनाचा अंगिकार केला. उभय देशांच्या द्विपक्षीय संबंधातील महत्वाचा टप्पा मानला जातो. परस्पर हिताच्या विविध क्षेत्रांचा समावेश असलेले अनेक सामंजस्य करार आणि करार करण्यात आले. या भेटीच्या मुख्य आकर्षणांमध्ये मालदीवची विमान प्रवास क्षमतेत वाढ करणाऱ्या हनीमाधू आंतरराष्ट्रीय विमानतळावर नवीन धावपट्टीचे उद्घाटन समाविष्ट होते. याव्यतिरिक्त, मालदीव मधील घरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, एक्झिम बँक ऑफ इंडियाच्या खरेदीदारांच्या क्रेडिट सुविधेअंतर्गत बांधण्यात आलेले 700 सामाजिक गृहनिर्माण युनिट्स अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आले. याव्यतिरिक्त, या भेटीदरम्यान मालदीवमध्ये रुपे कार्ड देखील सुरू करण्यात आले होते.

म्यानमार हा एक महत्त्वाचा शेजारी देश आहे, भारतासोबत दीर्घ लांबीची भू आणि सागरी सीमा लाभली आहे. भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' आणि 'ॲक्ट ईस्ट' धोरणाच्या एककेंद्राभिमुखतेमुळे, आसियान राष्ट्रांसह दक्षिण-पूर्व आशियाई देशांशी भारताच्या संबंधांसाठी म्यानमार महत्त्वाचा आहे. भारत आणि म्यानमार यांच्यात दृढ सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नागरिक परस्पर संबंध राहिले आहेत. बौद्ध धर्म हा एक महत्त्वाचा सांस्कृतिक दुवा आहे आणि तो भारताच्या म्यानमार सह सामायिक वारशाचा एक भाग आहे.

फेब्रुवारी 2021 पासून, म्यानमार मधील राजकीय आणि सुरक्षा परिस्थिती बिघडली आहे. म्यानमार मधील सध्याची सुरक्षा आणि मानवतावादी परिस्थिती चिंतेचा विषय आहे. कारण त्याचा थेट परिणाम

भारतावर दिसून येत आहे.  हिंसाचार पूर्णपणे थांबविण्याचे, संवादाद्वारे समस्यांचे निराकरण करण्याचे, राजकीय कैद्यांची सुटका करण्याचे आणि म्यानमारला शक्य तितक्या लवकर लोकशाही मार्गावर परतण्याचे आवाहन भारताने केले आहे.

भारत आणि नेपाळ त्यांचा अद्वितीय, बहुआयामी आणि मजबूत संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न राहिला आहे. जे सामायिक ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक आणि सभ्यता संबंधांवर आधारित आहेत. भारत आणि नेपाळमधील खुली सीमा आणि नागरिकांचा मुक्त संचार या मजबूत आणि सखोल संबंधांना प्रतिबिंबित करते. 'नेबरहूड फर्स्ट' या दृष्टिकोनाच्या नुसार ऊर्जा, व्यापार, रेल्वे, डिजिटल पायाभूत सुविधा आणि संस्कृती यासारख्या विविध कनेक्टिव्हिटी उपक्रमांचा जलद विस्तार आणि मजबूतीकरण करण्यात आले आहे.

जूनमध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या पंतप्रधानांच्या शपथविधी सोहळ्याला नेपाळचे तत्कालीन पंतप्रधान पुष्पकमल दहल 'प्रचंड' उपस्थित होते.  जुलैमध्ये, पंतप्रधानांनी नेपाळचे नवनियुक्त पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांना अभिनंदन संदेश पाठविला.  त्यानंतर, पंतप्रधान ओली ऑगस्टमध्ये भारताने आयोजित केलेल्या 3 ऱ्या व्हॉइस ऑफ ग्लोबल साऊथ शिखर परिषदेत व्हर्च्युअली सहभागी झाले.  सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्क मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या 79 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांची भेट पार पडली.



सप्टेंबर 2024 रोजी न्यूयॉर्क येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या 79 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी नेपाळचे पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांची भेट घेतली.

जानेवारीमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी नेपाळला भेट दिली आणि नेपाळचे तत्कालीन परराष्ट्र व्यवहार मंत्री नारायण प्रकाश सौद यांच्यासोबतच्या बैठकीत भाग घेतला आणि द्विपक्षीय सहकार्याच्या संपूर्ण

व्याप्तीचा आढावा घेतला.  नंतर ऑगस्टमध्ये, नेपाळचे नवीन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. आरजू राणा देऊबा यांनी भारताला औपचारिक भेट दिली आणि त्यादरम्यान त्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली.

भारत आणि श्रीलंकेला बौद्धिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक संवादाचा वारसा आहे आणि उभय देशांमधील संबंध 2500 वर्षांहून अधिक जुने आहेत.  श्रीलंका हा नेबरहूड फर्स्ट धोरणाच्या दृष्टिकोनातून तसेच सागर सिद्धांताच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाचा भागीदार आहे.

वर्षभरात, आर्थिक, विकासात्मक, सांस्कृतिक आणि लोकांमधील संबंध अधिक दृढ करण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विविध नेतृत्व-स्तरीय सहभाग आणि उपक्रमांद्वारे द्विपक्षीय संबंध सुरू राहिले.

फेब्रुवारीमध्ये, पंतप्रधानांनी श्रीलंकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांच्यासह संयुक्तपणे श्रीलंकेत UPI चे उद्घाटन केले.  त्यानंतर, राष्ट्राध्यक्ष विक्रमसिंघे यांनी पंतप्रधानांच्या शपथविधी समारंभाला उपस्थित राहण्यासाठी 9-10 जून रोजी भारताला भेट दिली आणि नंतर ऑगस्टमध्ये व्हॉइस ऑफ ग्लोबल साउथ शिखर परिषदेच्या 3 ऱ्या आवृत्तीमध्ये सहभागी झाले.

जूनमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी श्रीलंकेला भेट दिली आणि त्यांचे तत्कालीन समपदस्थ परराष्ट्रमंत्री एम.यू.एम. अली साबरी यांच्याशी सविस्तर चर्चा केली.  20 जून रोजी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांच्या कोलंबो भेटीदरम्यान, 6 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या भारतीय अनुदान याद्वारे स्थापन झालेल्या शोध आणि बचाव कार्यांसाठी एक मुख्य केंद्र असलेल्या सागरी बचाव समन्वय केंद्राचे (MRCC) उद्घाटन देखील पूर्ण झाले.

श्रीलंकेतील नवीन सरकार आणि राजकीय नेतृत्वाच्या निवडीनंतर, ऑक्टोबरमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी श्रीलंकेचा दौरा केला आणि नवनिर्वाचित राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसनायके यांना भेटणारे ते पहिले परदेशी मान्यवर ठरले.  या भेटीदरम्यान, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी परराष्ट्रमंत्री विजिथा हेरथ यांच्याशीही चर्चा केली.  15-17 डिसेंबर रोजी, राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसनायके यांनी भारताला औपचारिक भेट दिली.  अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर ही त्यांची पहिली विदेशी भेट होती.  राष्ट्रपती दिसनायके आणि पंतप्रधानांनी "सामायिक भविष्यासाठी भागीदारी विस्तार" शीर्षक असलेले संयुक्त निवेदनाचा स्विकार केला.



श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसनायके यांची पंतप्रधानांच्या समवेत पहिल्या भारत भेटीदरम्यान भेट पार पडली. उभय नेत्यांनी डिसेंबर 2024 मध्ये नवी दिल्ली येथे "सामायिक भविष्यासाठी भागीदारी विस्तार" या शीर्षकाखाली संयुक्त निवेदन जारी केले होते.

पाकिस्तान सोबत सुरळीत संबंध असावेत अशी भारताची इच्छा असली तरीही, दहशतवाद, शत्रुत्व आणि हिंसाचार मुक्त वातावरणात उभय देशांमधील समस्या द्विपक्षीय आणि शांततेने सोडविण्याचा भारताचा आग्रह राहिला आहे. असे अनुकूल वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पाकिस्तानवर आहे. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर भारत तडजोड करणार नाही आणि भारताची सुरक्षा आणि प्रादेशिक अखंडता बाधित करण्याच्या सर्व प्रयत्नांचा सामना करण्यासाठी भारत दृढ आणि निर्णायक पावले उचलेल हे स्पष्ट करण्यात आले आहे.

कैदी आणि मच्छिमारांची देवाणघेवाण आणि पाकिस्तानसोबत तीर्थयात्रा आयोजन यासारख्या मुद्द्यांचा भारत सातत्याने पाठपुरावा करत आहे. भारत आणि पाकिस्तानने जानेवारीत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आण्विक आस्थापने आणि केंद्रे यावरील हल्ल्यांवर बंदी घालण्याच्या करारांतर्गत असलेल्या आस्थापनांची आणि आण्विक केंद्रांच्या यादीची देवाणघेवाण केली. ऑक्टोबरमध्ये 23 व्या SCO सरकार प्रमुखांच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी पाकिस्तानला भेट दिली.

प्रादेशिक संपर्क आणि सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने, भारताने बंगालच्या उपसागरातील बहु क्षेत्रीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य उपक्रम (BIMSTEC) अंतर्गत विविध उपक्रमांमध्ये देखील योगदान दिले आहे. जुलैमध्ये नवी दिल्ली येथे 2 ऱ्या BIMSTEC परराष्ट्र मंत्र्यांच्या रिट्रीटसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी त्यांच्या BIMSTEC सहकाऱ्याचे आयोजन केले होते. त्यानंतर ऑगस्टमध्ये, भारताने नवी दिल्ली येथे 1ले BIMSTEC व्यवसाय शिखर परिषद आयोजित केली. ज्यामध्ये बंगालच्या उपसागर क्षेत्रातील 300 हून अधिक भागधारक सहभागी झाले होते.

जूनमध्ये पंतप्रधानांनी बिहारमधील राजगीर जवळ नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसचे उद्घाटन केले. पंतप्रधानांनी तिसरा कार्यकाळ स्विकारल्यानंतर 100 दिवसांच्या आत उद्घाटन झालेला हा

पहिलाच महत्वपूर्ण प्रकल्प होता.  बौद्धिक, तात्विक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक अभ्यासासाठी आंतरराष्ट्रीय संस्था म्हणून नालंदाच्या प्राचीन वैभवाचे पुनरुज्जीवन करण्याचे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. या प्रयत्नात भारतासह, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, भूतान, ब्रुनेई दारुसलाम, कंबोडिया, चीन, इंडोनेशिया, लाओस, मॉरिशस, म्यानमार, न्यूझीलंड, पोर्तुगाल, सिंगापूर, दक्षिण कोरिया, श्रीलंका, थायलंड आणि व्हिएतनाम यासह 17 देश सहभागी आहेत.  विद्यापीठ कॅम्पसच्या उद्घाटन समारंभात सहभागी होण्यासाठी नमूद देशांचे राजदूत देखील नालंदा येथे दाखल झाले होते.

वर्षभरात, भारताने उच्च-स्तरीय राजनैतिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सहभागाद्वारे कोमोरोस, मडगास्कर, मॉरिशस आणि सेशेल्स सह हिंद महासागर प्रदेशातील राष्ट्रांशी आपले संबंध मजबूत केले. कोमोरोस चे अध्यक्ष अझाली असौमानी आणि सेशेल्स चे उपाध्यक्ष अहमद अफिफ यांच्यासह या प्रदेशातील नेत्यांशी बैठक करून भारताने आपल्या SAGAR व्हिजनला बळकटी दिली.  या बैठकांमध्ये द्विपक्षीय संबंध वाढविण्यावर आणि प्रादेशिक सहकार्य वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले गेले.

पंतप्रधान आणि मॉरिशसचे तत्कालीन पंतप्रधान प्रविंद जगन्नाथ यांनी भारत सरकारच्या आर्थिक सहाय्याने राबविण्यात आलेल्या सहा सामुदायिक विकास प्रकल्पांसह अगलेगा बेटावर नवीन हवाई पट्टी आणि जेट्टी चे आभासी उद्घाटन केले.  जागतिक सरकार शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधानांनी मादागास्करचे अध्यक्ष अँड्री राजोएलिना यांची भेट घेतली.  संरक्षण सहकार्या दरम्यान 'मिलन 2024' आणि मेरीटाइम हेड्स फॉर ॲक्टिव्ह सिक्युरिटी अँड ग्रोथ फॉर ऑल इन द रीजन (महासागर) यासारख्या संयुक्त सरावाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय नौदलाने नोव्हेंबरमध्ये महासागर या उच्च-स्तरीय आभासी संवादाची तिसरी आवृत्ती आयोजित केली होती, त्या दरम्यान नौदल प्रमुखांनी बांगलादेश, कोमोरोस, केनिया, मादागास्कर, मालदीव, मॉरिशस, मोझांबिक, सेशेल्स, श्रीलंका आणि टांझानिया या हिंद महासागर प्रदेशातील नौदल/सागरी एजन्सी प्रमुखांशी आणि वरिष्ठ नेतृत्वाशी संवाद साधला.  या संवादाचा विषय 'IOR मधील सामान्य सागरी सुरक्षा आव्हाने कमी करण्यासाठी प्रशिक्षण सहकार्य' होता, जो हिंद महासागर क्षेत्रातील सामान्य सागरी आव्हाने कमी करण्यासाठी क्षमता बांधणीमध्ये सहकार्यासाठी सध्याच्या आणि आवश्यक गोष्टींवर प्रकाश टाकतो.

बहु-राष्ट्रीय सराव MILAN ची 12 वी आवृत्ती फेब्रुवारीमध्ये सुरू झाली.  ही आवृत्ती सर्वात मोठी होती आणि त्यात भारतीय जहाजे आणि 16 विदेशी युद्धनौका आणि इतर भागीदार देशांचे शिष्टमंडळ यांचा सहभाग होता.  या सरावामुळे सागरी सुरक्षा, शांतता आणि समृद्धीचे सामायिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले प्रादेशिक समन्वय स्थापित करण्यासाठी एकत्रितपणे प्रशिक्षण आणि कार्य करण्यासाठी समान विचारसरणीच्या राष्ट्रांना एकत्र आणले.

ॲक्ट ईस्ट धोरणाच्या एकूण चौकटी अंतर्गत दक्षिण-पूर्व आशियाई देश आणि इंडो-पॅसिफिकमधील देशांशी भारताचे संबंध, या वर्षी विविध स्तरांवर विस्तारीत आणि सखोल होत गेले.  मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी ऑगस्टमध्ये भारताचा भेट दिली आणि पंतप्रधानांशी चर्चा केली.  या भेटीदरम्यान, भारत-मलेशिया द्विपक्षीय संबंध 2015 मध्ये स्थापन झालेल्या वर्धित धोरणात्मक भागीदारी वरून सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीमध्ये उन्नत झाले.



ऑगस्ट 2024 मध्ये नवी दिल्ली येथे पंतप्रधान आणि  मलेशियाचे पंतप्रधान दातो' सेरी अन्वर बिन इब्राहिम यांची भेट पार पडली

पंतप्रधानांनी 03-04 सप्टेंबर रोजी ब्रुनेई येथे एक ऐतिहासिक भेट दिली, जी भारतीय पंतप्रधानांची पहिलीच द्विपक्षीय औपचारिक भेट होती, जी योगायोगाने राजकीय संबंधांच्या स्थापनेच्या 40 व्या वर्धापन दिवशी होती.  पंतप्रधानांनी 10-11 ऑक्टोबर रोजी 21 व्या आसियान-भारत शिखर परिषदेसाठी आणि 19 व्या पूर्व आशिया शिखर परिषदेसाठी व्हिएन्टियान लाओस येथे भेट दिली.  या भेटीदरम्यान, पंतप्रधानांची लाओ पीडीआरचे पंतप्रधान सोनेक्से सिफांडोन यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक पार पडली.




ऑक्टोबर 2024 मध्ये व्हिएन्टियान येथे झालेल्या 21 व्या आसियान-भारत शिखर परिषदेत आसियान नेत्यांसोबत पंतप्रधान

पंतप्रधानांनी 04-05 सप्टेंबर दरम्यान सिंगापूरला भेट दिली.  ही पंतप्रधानांची सिंगापूरला 5वी भेट होती. या भेटीदरम्यान भारत-सिंगापूर संबंध सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी स्तरावर पोहोचले आहेत

आणि सेमीकंडक्टर इकोसिस्टम, डिजिटल तंत्रज्ञान, आरोग्यसेवा आणि कौशल्य विकास या क्षेत्रातील सहकार्यासाठी चार सामंजस्य करारांची देवाणघेवाण करण्यात आली.



माननीय राष्ट्रपती यांचे गव्हर्नर जनरल डेम सिंडी किरो यांनी पारंपारिक माओरी "पौहिरी" समारंभासह सरकारी निवासस्थानी स्वागत केले.

जुलैमध्ये व्हिएतनाम येथे झालेल्या आसियान-भारत परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत आणि मंत्रीपदोत्तर परिषदेत परराष्ट्र व्यवहार मंत्री सहभागी झाले. वर्षभरात, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी ब्रुनेई (जुलै), कंबोडिया (जुलै), इंडोनेशिया (ऑक्टोबर आणि नोव्हेंबर), मलेशिया (मार्च, जुलै आणि ऑक्टोबर), फिलीपिन्स (मार्च), सिंगापूर (ऑगस्ट) आणि थायलंड (नोव्हेंबर) येथील त्यांच्या सहकाऱ्यांची भेट घेतली आणि चर्चा केली. द्विपक्षीय सहकार्याला चालना देण्यासाठी आणि प्रादेशिक विकासावर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी संरक्षण मंत्र्यांनी 11 व्या आसियान मीटिंग-प्लस (ADMM प्लस) साठी 20-22 नोव्हेंबर रोजी व्हिएन्टिनला भेट दिली.


भारत-ऑस्ट्रेलिया द्विपक्षीय संबंधांच्या विविध क्षेत्रांमध्ये उच्च स्तरीय संवाद आणि सहकार्य वाढले. G20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर नोव्हेंबरमध्ये रिओ दि जानेरो येथे 2 री भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. द्विपक्षीय शिखर परिषदेत, पंतप्रधान आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी भारत-ऑस्ट्रेलिया नवीकरणीय ऊर्जा भागीदारीच्या आरंभाचे स्वागत केले. नोव्हेंबरमध्ये कॅनबेरा येथे झालेल्या 15 व्या भारत-ऑस्ट्रेलिया परराष्ट्र मंत्र्यांच्या फ्रेमवर्क डायलॉग अंतर्गत, परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि परराष्ट्र मंत्री पेनी वोंग यांनी द्विपक्षीय सहकार्याच्या संपूर्ण क्षेत्रांचा आढावा घेतला. परराष्ट्र व्यवहार मंत्री फेब्रुवारीमध्ये पर्थ येथे इंडियन ओशन कॉन्फरन्स मध्येही सहभागी झाले. नोव्हेंबरमध्ये क्वीन्सलँड च्या गव्हर्नर जेनेट यंग यांच्या भेटीदरम्यान परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी ब्रिस्बेन मधील नवीन भारताच्या वाणिज्य दूतावासाचे उद्घाटन केले. ऑक्टोबरमध्ये चौथ्या 2+2 परराष्ट्र व संरक्षण सचिवांच्या सल्लामसलती सह संरक्षण सहकार्यात मोठी प्रगती झाली.

भारताचे न्यूझीलंड सह द्विपक्षीय संबंधात उच्च-स्तरीय देवाणघेवाण झाली. माननीय राष्ट्रपती जी यांनी ऑगस्टमध्ये न्यूझीलंडला भेट दिली. त्यांच्या भेटीदरम्यान, द्विपक्षीय सीमाशुल्क सहकार्य व्यवस्थेवर

स्वाक्षरी करण्यात आली आणि जुलैमध्ये संसदेने मान्यता दिल्यानंतर न्यूझीलंड ISA मध्ये सामील झाला. ऑक्टोबरमध्ये, व्हिएन्शिअन येथे झालेल्या आसियान-भारत शिखर परिषदेच्या वेळी पंतप्रधानांनी न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांची भेट घेतली. नंतर नोव्हेंबरमध्ये, EAM ने कॅनबेरा येथे उपपंतप्रधान आणि न्यूझीलंडचे परराष्ट्र मंत्री विन्स्टन पीटर्स यांच्याशी 'रायसीना डाउन अंडर'च्या पार्श्वभूमीवर बैठक केली.

भारताने ॲक्ट ईस्ट धोरण अंतर्गत पॅसिफिक द्वीपकल्पीय देशांशी (PICs) विकास सहकार्य, हवामान कृती, आरोग्य उपक्रम आणि सांस्कृतिक संबंधांवर लक्ष केंद्रित करून दृढ आणि बहुआयामी संबंध प्रस्थापित केले आहेत. दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या माध्यमातून भारत दरवर्षी फिजी, पापुआ न्यू गिनी, नौरू, सोलोमन बेटे, टोंगा, तुवालू, किरिबाती, पलाऊ, वानुआतु आणि मार्शल बेट प्रजासत्ताक यासह 14 PICs ना आर्थिक मदत पुरवतो, ज्यामुळे सौर विद्युतीकरण, पाणी साठवण, आपत्ती निवारण आणि आरोग्यसेवा प्रणाली यासारख्या विकासाच्या विविध प्रकल्पांना सहाय्य मिळते. नोव्हेंबरमध्ये ग्लोबल बायोफ्युएल्स अलायन्स मध्ये फिजी त्याचा 28 वा सदस्य म्हणून सामील झाला. फिजीचे उपपंतप्रधान मानोआ कामिकामिका यांनी नोव्हेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडी (ICA) महासभा आणि जागतिक परिषदेत भाग घेतला, ज्याचे उद्‌घाटन पंतप्रधानांनी दिल्लीत केले होते. ICAजागतिक सहकारी चळवळीची प्रमुख संस्था असलेल्या ICA च्या 130 वर्षांच्या इतिहासात प्रथमच ICA ग्लोबल को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स आणि ICA जनरल असेंब्लीचे आयोजन भारतात करण्यात आले.

स्वतंत्रपणे, MoS (पंतप्रधान) यांनी ऑगस्टमध्ये 53 व्या पॅसिफिक आयलंड फोरम (PIF) नेत्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी टोंगा राज्याला भेट दिली आणि 14 PICs, मध्ये त्यांच्या संबंधित गरजांनुसार प्रत्येकाला USD 50,000 किमतीच्या क्विक इम्पॅक्ट प्रोजेक्ट (QIP) साठी भारताच्या सहाय्याची घोषणा केली. PIF बैठकीत भारताचा मंत्रालयीन स्तरावरील हा पहिलाच सहभाग होता. भारताने भूस्खलन मदत कार्यासाठी पापुआ न्यू गिनीला USD 1 दशलक्ष आणि भूकंपानंतर वानुआटुला USD 500,000 मदत यासह महत्त्वपूर्ण मानवतावादी मदत देखील दिली. हवामान कृतीला प्राधान्य देऊन, सोलोमन बेटे आणि टोंगा येथे ISA अंतर्गत सौरीकरण प्रकल्प आणि व्यापक उपक्रम राबविण्यात आले आहेत. PIF सदस्य देशांसह आरोग्य सहकार्यामध्ये औषधे आणि उपकरणांचा पुरवठा, सोलोमन बेट आणि नौरू द्वारे भारतीय फार्माकोपियाची मान्यता आणि वर्षभरात नौरू मध्ये पहिले जन औषधी केंद्र स्थापन करणे यांचा समावेश आहे.



जपानचे तत्कालीन प्रधानमंत्री फुमियो किशिदा आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बनीज सह अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बायडन यांनी विल्मिंगटन येथे सप्टेंबर 2024 ला आयोजित केलेल्या 6 व्या क्वाड नेत्यांच्या शिखर परिषदेत प्रधानमंत्री सहभागी झाले होते.

"भारताचा इंडो-पॅसिफिक प्रदेश याबाबतचा दृष्टिकोन मुक्त, खुले, समावेशक आणि आंतरराष्ट्रीय कायद्याने शासित असलेल्या प्रदेशाच्या उभारणीवर केंद्रित आहे. हे वर्ष भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाचे आणि सागर सिद्धांत अंतर्गत इंडो-पॅसिफिक क्षेत्रासाठी दृष्टिकोनाचे दशक होते. पंतप्रधानांनी विल्मिंग्टन अमेरिकेतील क्वाड नेतृत्वाच्या शिखर परिषदेत सहभाग नोंदविला

21 सप्टेंबर 2024, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिकेच्या आपल्या समपदस्थांसह. आरोग्य, सुरक्षा, तंत्रज्ञान, हवामान आणि पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करून, जागतिक शक्ती म्हणून क्वाड नेत्यांनी गटाची भूमिका अधोरेखित केली. सर्व्हिकल कॅन्सरचा सामना करण्यासाठी आणि महामारीची तयारी सुधारण्यासाठी क्वाड कॅन्सर मूनशॉट उपक्रमाचा समावेश प्रमुख परिणामांमध्ये होतो. क्वाड छत्राखाली सागरी सुरक्षा प्रयत्नांना, सागरी क्षेत्र जागरूकता आणि नवीन प्रशिक्षण उपक्रमासाठी इंडो-पॅसिफिक भागीदारी द्वारे पुढे नेण्यात आले. क्वाड पोर्ट्स ऑफ द फ्युचर पार्टनरशिप आणि समुद्राखालील केबल अपग्रेड सारख्या पायाभूत सुविधा प्रकल्पांनी कनेक्टिव्हिटी आणि लवचिकता यावर भर दिला. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, क्वाड नेत्यांनी AI, बायोटेक्नॉलॉजी आणि अर्धवाहक यामध्ये उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली."

भारत आणि अमेरिका (US) यांच्यात एक व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे जी मानवी प्रयत्नांच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांना व्यापते जी सामायिक लोकशाही मूल्ये, विविध मुद्द्यांवर हितसंबंधांचे एकत्रीकरण आणि लोकांमधील उत्साही संपर्क याद्वारे प्रेरित आहे. नेत्यांमधील नियमित संवाद हा द्विपक्षीय संबंधांच्या विस्ताराचा एक महत्त्वाचा घटक आहे. भारत आणि अमेरिका यांनी 2+2 मंत्रीस्तरीय द्विपक्षीय संवादाद्वारे तसेच G20, I2U2 आणि क्वाड यासारख्या बहुपक्षीय चौकटीच्या अंतर्गत मजबूत सहकार्य कायम ठेवले. या आदान-प्रदानांचे परिणाम दोन्ही देशांमधील बहुआयामी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

सप्टेंबरमध्ये विल्मिंग्टन येथे क्वाड नेत्यांच्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांसोबत झालेल्या द्विपक्षीय बैठकीदरम्यान, भारत आणि अमेरिकेने चार प्रमुख दस्तऐवज स्वीकारले. यामध्ये त्यांच्या भागीदारीवरील संयुक्त तथ्य पत्रक, सुरक्षित आणि विश्वसनीय जागतिक स्वच्छ ऊर्जा पुरवठा साखळी तयार करण्यासाठी अमेरिका-भारत पुढाकार याचा रोडमॅप आणि पिलर्स III आणि IV साठी इंडो-पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क (IPEF) च्या मंजुरीच्या साधने यांचा समावेश होतो.

अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (NSA) जेक सुलिव्हन यांनी जूनमध्ये नवी दिल्लीत पंतप्रधानांची भेट घेऊन परस्पर हिताच्या द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. भेटीदरम्यान, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी NSA सुलिव्हन यांच्याशीही चर्चा केली. NSA सुलिव्हन यांच्यासोबत अमेरिकेचे तत्कालीन उप-परराष्ट्रमंत्री कर्ट कॅम्पबेल, नॅशनल सायन्स फाउंडेशन (एनएसएफ) चे संचालक, अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषद, ऊर्जा विभाग, राष्ट्रीय वैमानिकी आणि अंतराळ प्रशासन (नासा), NSF आणि US एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (USAID) चे वरिष्ठ प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या वरिष्ठ अमेरिकन अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ होते. दोन्ही राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी क्रिटिकल अँड इमर्जिंग टेक्नॉलॉजी (iCET) वरील पहिल्या भारत-अमेरिका पुढाकार याच्या वार्षिक आढावा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. उभय बाजूंनी परस्पर सहकार्यासाठी आणि प्रलंबित मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याच्या पुढील मार्गांवर चर्चा केली. अंतराळात आंतर-कार्यक्षमता वाढविण्यासाठी मानवी अंतराळ उड्डाण सहकार्यासाठी एक धोरणात्मक आराखडा देखील तयार करण्यात आला. या बैठकीनंतर एक संयुक्त तथ्य पत्रक जारी करण्यात आले. सप्टेंबरमध्ये भारत आणि अमेरिकेने द्विपक्षीय 2+2 आंतर-सत्र बैठकही घेतली.


स्वतंत्रपणे, गृह परराष्ट्र व्यवहार समितीचे अध्यक्ष श्री. मायकल मॅकॉल यांच्या नेतृत्वाखालील द्विपक्षीय अमेरिकन काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जूनमध्ये भारताला भेट दिली आणि पंतप्रधानांची भेट घेतली. शिष्टमंडळाने परराष्ट्र सचिव आणि उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्याशी स्वतंत्रपणे बैठका घेतल्या. शिष्टमंडळाने धर्मशाला भेट दिली आणि 14 व्या दलाई लामा यांची भेट घेतली.

भारत अनेक प्रमुख बहुपक्षीय आणि बहुस्तरीय प्रतिबद्धतेत सहभागी झाला. UNGA च्या 79 व्या सत्रात, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी समकालीन जागतिक मुद्द्यांवर भारताची भूमिका मांडली आणि G4, G20, IBSA, BRICS, BIMSTEC, भारत-कॅरिबियन समुदाय (CARICOM) आणि भारत-लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन राज्यांचा समुदाय (CELAC) यासह अनेक परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकांमध्ये सहभागी झाले. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी जागतिक प्रशासकीय सुधारणा "कॉल टू ॲक्शन" ला मान्यता दिली आणि राष्ट्रीय अधिकारक्षेत्राच्या बाहेरील जैवविविधता (BBNJ) करारावर स्वाक्षरी केली. याव्यतिरिक्त, परराष्ट्र व्यवहार मंत्री ड्रग्सचे धोके, विकास नमुने आणि जागतिक स्तरावर भारताची भूमिका यावरील चर्चांमध्ये सहभागी झाले, ज्यात आशिया सोसायटी आणि ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (ORF) सारख्या थिंक टँकद्वारे आयोजित परराष्ट्र धोरण आऊटरीच सेमिनारचा समावेश आहे.

भारत आणि अमेरिका यांच्या दरम्यान संरक्षण सहकार्य देखील वर्षभरात मजबूत झाले. पंतप्रधान आणि अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जोसेफ आर. बायडन यांनी सप्टेंबरमध्ये पंतप्रधानांच्या विल्मिंग्टन भेटीदरम्यान लॉकहीड मार्टिन आणि टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लिमिटेड यांच्यातील C-130J सुपर हर्क्युल्स विमान यांच्या दरम्यान झालेल्या सहकार्य कराराचे कौतुक केले. सप्टेंबरमध्ये सिलिकॉन व्हॅली शिखर परिषदेत स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य कराराद्वारे संरक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन्स फॉर डिफेन्स

एक्सलन्स (iDEX) आणि यूएस (डिपार्टमेंट ऑफ डिफेन्स) DoD's च्या डिफेन्स इनोव्हेशन युनिट (DIU) यांच्यातील वाढीव सहकार्य याचेही नेत्यांनी स्वागत केले.

जानेवारीमध्ये, भारतीय नौदलाने गुआम येथे अमेरिकन नौदलाने आयोजित केलेल्या पाणबुडीविरोधी युद्ध प्रशिक्षणाच्या 4 थ्या आवृत्तीत - "एक्सरसाईज सी ड्रॅगन 24" मध्ये सहभागी झाले. या वर्षात, भारत आणि अमेरिका यांनी अनेक प्रमुख द्विपक्षीय संरक्षण सरावांमध्ये सहभाग घेतला ज्यामध्ये पुढील सराव समाविष्ट होते: भारत-अमेरिका द्विपक्षीय ट्राय-सर्व्हिस HADR ॲम्फिबियस एक्सरसाईज अँड एक्सरसाईज टायगर ट्रायम्फ 24 (विशाखापट्टणम, मार्च), ज्याने अमेरिकन नौदल, मरीन कॉर्प्स आणि सैन्यासह भारतीय नौदल, लष्कर आणि हवाई दल एकत्र आणले. एप्रिलमध्ये स्वतंत्रपणे, दोन्ही देशांचे वरिष्ठ लष्करी अधिकारी हवाई येथील US आर्मी पॅसिफिक मुख्यालयात भारत-अमेरिका आर्मी एक्झिक्युटिव्ह स्टीअरिंग ग्रुप (ESG) च्या 7 व्या बैठकीसाठी एकत्र आले. त्यांच्या चर्चा उदयोन्मुख धोके, संघर्ष निवारण धोरणे आणि आधुनिक संरक्षण आव्हानांचा सामना करण्यावर केंद्रित होत्या.



सप्टेंबर 2024 मध्ये न्यूयॉर्क येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या 79 व्या सत्रात परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी भारताची बाजू मांडली

भारत-कॅनडा संबंध पारंपारिकपणे दृढ नागरिक परस्पर आणि मजबूत आर्थिक संबंधांवर आधारित आहेत. 14 जून रोजी इटलीतील अपुलिया येथे झालेल्या G7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी कॅनडाचे तत्कालीन पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची भेट घेतली. आमच्या द्विपक्षीय संबंधांच्या पूर्व अटींमध्ये परस्पर समजूतदारपणा, एकमेकांच्या चिंतेचा आदर आणि एकमेकांच्या प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्व याबद्दल अविरत आदर यांचा समावेश आहे. या संदर्भात, भारताने कॅनडा सरकारला, त्यांच्या भूमीतून कार्यरत असलेल्या सर्व भारतविरोधी घटकांवर त्वरित आणि प्रभावी कारवाई करण्याची वारंवार विनंती केली आहे.

वर्षभरात भारत-रशिया संबंधांमध्ये सातत्याने प्रगती होत राहिली. पंतप्रधानांनी जुलैमध्ये 22 व्या वार्षिक शिखर परिषदेसाठी मॉस्कोला आणि ऑक्टोबरमध्ये 16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी कझान येथे भेट दिली. 2023-24 मध्ये रशिया सोबतचा द्विपक्षीय व्यापार USD 65.7 अब्ज डॉलर्सच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला. ज्यामुळे रशिया भारताचा 4 था सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला. व्यापार-आर्थिक-वैज्ञानिक-तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक सहकार्य (IRIGC-TEC)

वरील भारत-रशिया आंतर-सरकारी आयोगाचे 25 वे सत्र नोव्हेंबरमध्ये नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते आणि त्याचे सह-अध्यक्षपद परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी आणि रशियन फेडरेशनचे पहिले उपपंतप्रधान डेनिस मंतुरोव्ह यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. डिसेंबरमध्ये स्वतंत्रपणे, संरक्षण मंत्री यांनी भारत-रशिया आंतर-सरकारी आयोगाच्या लष्करी आणि लष्करी-तांत्रिक सहकार्याच्या (IRIGC- M&MTC) 21 व्या सत्राचे सह-अध्यक्षपद भूषविण्यासाठी रशियाला भेट दिली. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी आणि त्यांचे रशियन समपदस्थ सर्गेई लाव्रोव्ह यांनी जुलैमध्ये अस्ताना येथे SCO शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, जुलैमध्ये व्हिएन्शिअन मध्ये आसियान फ्रेमवर्क अंतर्गत परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत, सप्टेंबरमध्ये रियाध येथे झालेल्या गल्फ कोऑपरेशन कौन्सिलच्या बैठकीत आणि सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्कमध्ये 79 व्या UNGA सत्राच्या पार्श्वभूमीवर अनेक द्विपक्षीय बैठका केल्या. शिवाय, NSA यांनी सप्टेंबरमध्ये BRICS NSA च्या बैठकीसाठी सेंट पीटर्सबर्ग येथे भेट दिली. या भेटीदरम्यान, NSA यांनी राष्ट्राध्यक्ष पुतिन यांची भेट घेतली आणि त्यांचे रशियन समपदस्थ सर्गेई शोईगू यांच्याशी द्विपक्षीय बैठक झाली.

युरोपीय देश आणि युरोपियन युनियन (EU) सोबत भारताच्या संबंधाने अनेक उच्च-स्तरीय सहभागांसह नवीन गती गाठली. भारत आणि EU ने 2024 मध्ये त्यांच्या धोरणात्मक भागीदारीचे 20 वर्ष साजरे केले. या वर्षात व्यापार आणि गुंतवणूक, उदयोन्मुख तंत्रज्ञान, नवकल्पना, हरित अवस्थांतर, सुरक्षा, तसेच स्थलांतर आणि गमनशीलता या क्षेत्रात उच्च-स्तरीय संवाद आणि सहकार्य आणखीन मजबूत झाले.

ऑक्टोबरमध्ये व्हिएन्टियान येथे झालेल्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर युरोपियन परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष चार्ल्स मिशेल यांनी पंतप्रधानांशी बैठक केली. नोव्हेंबरमध्ये रिओ दि जानेरो येथे झालेल्या G20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी पंतप्रधानांची भेट घेतली.

फ्रेंच रिपब्लिकचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी भारताच्या 75 व्या प्रजासत्ताक दिनासाठी मुख्य अतिथी म्हणून भारताला भेट दिली. त्यांच्या शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेदरम्यान, उभय बाजूंनी 2026 ला 'भारत-फ्रान्स नवकल्पनेचे वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला. उभय बाजूंनी संरक्षण, अंतराळ, नागरी विमान वाहतूक, S&T, आरोग्य, सार्वजनिक प्रशासन आणि शहरी विकास यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये अनेक सामंजस्य करार/करारांवर स्वाक्षरी केली.



माननीय राष्ट्रपती जी, पंतप्रधान आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची जानेवारी 2024 मध्ये नवी दिल्ली येथे 75 व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात उपस्थिती होती

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधानांनी जूनमध्ये G7 शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी इटलीला भेट दिली. G7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधानांनी इटलीच्या पंतप्रधान, जर्मनीचे संघराज्य प्रजासत्ताकचे चॅन्सलर, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष आणि युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान यांच्याशी स्वतंत्र बैठका घेतल्या.

पंतप्रधानांनी जुलैमध्ये ऑस्ट्रियाला भेट दिली, जी 41 वर्षांमध्ये भारतीय पंतप्रधानांची पहिली भेट होती, जी योगायोगाने राजनैतिक संबंधांच्या 75 व्या वर्धापन दिवशी होती. भेटीदरम्यान वर्धित भारत-ऑस्ट्रिया भागीदारीवर संयुक्त निवेदन जारी करण्यात आले. पंतप्रधानांनी राष्ट्रपती अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतली आणि चॅन्सलर कार्ल नेहमर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली.

पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्या आमंत्रणावरून, पंतप्रधानांनी ऑगस्टमध्ये पोलंडला भेट दिली, भेटीला दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेच्या 70व्या वर्षपूर्तीची देखील पार्श्वभूमी होती. भेटीदरम्यान, पंतप्रधानांनी पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याशी चर्चा केली आणि राष्ट्रपती आंद्रेज दुडा यांची भेट घेतली. भारत-पोलंड द्विपक्षीय संबंधांना धोरणात्मक भागीदारी पर्यंत वाढवण्याची घोषणा हा या भेटीचा सर्वात महत्त्वाचा परिणाम होता.

ऑक्टोबरमध्ये स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेड्रो सांचेझ यांनी भारताला भेट दिली. या भेटीदरम्यान, पंतप्रधान आणि राष्ट्रपती सांचेझ यांनी स्पेनच्या सहकार्याने टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीमद्वारे बांधलेल्या वडोदरा येथील C295 विमानाच्या अंतिम असेंब्ली लाईन प्लांटचे संयुक्तपणे उद्‌घाटन केले.

सप्टेंबरमध्ये न्यू यॉर्क मध्ये 79 व्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी बेल्जियमच्या पंतप्रधानांची भेट घेतली आणि बेल्जियम, फ्रान्स, नेदरलँड्स, यूके आणि स्पेनमधील त्यांच्या सहकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठका घेतल्या.

एका महत्त्वपूर्ण घडामोडीत, भारत आणि स्वित्झर्लंड, आइसलँड, नॉर्वे आणि लिकटेंस्टाईन यांचा समावेश असलेल्या युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन (EFTA) ने मार्चमध्ये व्यापार आणि आर्थिक भागीदारी करार (TEPA) वर स्वाक्षरी केली. या करारावर वाणिज्य आणि उद्योग मंत्री (CIM) यांनी स्विस फेडरल कौन्सिलर गाय पार्मेलिन, आइसलँडचे परराष्ट्र व्यवहार मंत्री बजार्नी बेनेडिक्टसन, लिकटेंस्टाईन चे परराष्ट्र व्यवहार मंत्री डोमिनिक हॅस्लर आणि नॉर्वेचे व्यापार व उद्योग मंत्री जॅन ख्रिश्चन वेस्त्रे यांच्यासह स्वाक्षरी केली. पुढील 15 वर्षांत 2039 पर्यंत, भारतात USD 1 दशलक्ष थेट नोकऱ्या निर्माण करण्यासाठी USD 100 अब्ज गुंतवणूकीची वचनबद्धता EPA मध्ये समाविष्ट आहे.



ऑगस्ट 2024 मध्ये वॉर्सा येथील कोल्हापूर स्मारकात पंतप्रधानांनी श्रद्धांजली वाहिली.



फेब्रुवारी 2024 मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या रायसिना संवादाच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी नॉर्डिक-बाल्टिक एट (NB8) च्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीचे आयोजन केले.

सप्टेंबरमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी जर्मनीला भेट देऊन चॅन्सलर ओलाफ स्कोल्झ यांची भेट घेतली. त्यांनी परराष्ट्र मंत्री अ‍ॅनालेना बेअरबॉक, संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस , चॅन्सलर यांचे परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण सल्लागार जेन्स प्लॉटनर तसेच संसद सदस्य (बुंडेस्टॅग) यांची स्वतंत्रपणे भेट घेतली आणि द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण व्याप्तीवर विस्तृत चर्चा केली. त्याच महिन्यात, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी स्वित्झर्लंडला भेट देऊन परराष्ट्र मंत्री इग्नाझिओ कॅसिस यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली आणि भारत-ईएफटीए मुक्त व्यापार कराराद्वारे व्यापार आणि गुंतवणूक वाढविण्याचा विचार केला.

नोव्हेंबरमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी G7 परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत उपस्थित राहण्यासाठी इटलीला भेट दिली. या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी इटलीचे परराष्ट्रमंत्री तसेच फ्रान्स आणि ब्रिटनमधील त्यांच्या सहकाऱ्यांची स्वतंत्रपणे भेट घेतली.

फेब्रुवारीमध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या रायसिना संवादाच्या 9 व्या आवृत्तीत अल्बेनिया, बोस्निया व हर्जेगोविना, चेक प्रजासत्ताक, डेन्मार्क, एस्टोनिया, फिनलंड, ग्रीस, हंगेरी, लॅटविया, लिकटेंस्टाईन, लिथुआनिया, रोमानिया, स्लोव्हाक प्रजासत्ताक आणि स्वीडन यांचे परराष्ट्र मंत्री सहभागी झाले होते. रायसिना संवादाच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी नॉर्डिक-बाल्टिक एट (NB8 च्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत स्वच्छ आणि हरित तंत्रज्ञान उन्नतीसाठी, डिजिटल आणि सायबर सहकार मजबूत करण्यासाठी, आणि उच्च गुणवत्तेचे कौशल्य विकास आणि लवचिक जागतिक पुरवठा साखळ्या वृद्धिंगत करण्यासाठी लक्ष केंद्रित करण्यात आले.

या वर्षी भारत-जपान विशेष सामरिक आणि जागतिक भागीदारीचा 10वा वर्धापन दिन साजरा केला. भारत आणि जपानने या वर्षात उच्च-स्तरीय भेटी, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि व्यापार यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये सहयोगात्मक उपक्रमांद्वारे त्यांच्या संबंधांना गती दिली, तसेच संयुक्त राष्ट्र, G20 आणि क्वाड मध्ये सहकार्य केले. वर्षभरात, पंतप्रधानांनी इटलीतील (जून) G7 शिखर परिषदेत आणि पुन्हा विल्मिंग्टन येथील क्वाड शिखर परिषदेत (सप्टेंबर) जपानचे तत्कालीन पंतप्रधान फुमियो किशिदा यांची दोनदा भेट घेतली. या देवाणघेवाणीच्या माध्यमातून, नेत्यांनी बहुआयामी संबंधांचा आढावा घेतला आणि सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी विचारांची देवाणघेवाण केली. ऑक्टोबरमध्ये, पंतप्रधानांनी लाओसमध्ये झालेल्या भारत-ASEAN शिखर परिषदेच्या वेळी नवनियुक्त पंतप्रधान शिगेरू इशिबा यांची भेट घेतली, दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, अर्धवाहक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यामध्ये सहकार्य वाढवण्याच्या वचनबद्धतेची पुन्हा पुष्टी केली.

ऑगस्टमध्ये, जपानच्या परराष्ट्र आणि संरक्षण मंत्र्यांनी तिसऱ्या 2+2 मंत्रालयीन बैठकीसाठी भारताला भेट दिली, ज्याची सह-अध्यक्षता संरक्षण मंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री यांनी केली. नोव्हेंबरमध्ये इटलीमध्ये G7 परराष्ट्र मंत्र्यांच्या आऊटरीच सत्राच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी जपानचे परराष्ट्र मंत्री ताकेशी इवाया यांचीही भेट घेतली.

जून 2020 पासून भारत आणि चीनने सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्यकारी यंत्रणेच्या (WMCC) 18 बैठका आणि वरिष्ठ लष्करी कमांडर स्तरावर 21 बैठका घेतल्या आहेत. ऑक्टोबरमध्ये,राजनैतिक आणि सैन्य स्तरावर झालेल्या वाटाघाटी व चर्चेनंतर, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील (LAC) काही भागात गस्त घालण्याच्या व्यवस्थेवर एक करार केला गेला. ज्यामुळे 2020 मध्ये या क्षेत्रांमध्ये उद्भवलेल्या समस्याचे वियोगीकरण झाले आणि मिटविण्यात आल्या. त्यानंतर, ऑक्टोबरमध्ये रशियातील कझान येथे

झालेल्या 16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या वेळी पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. जवळपास पाच वर्षांमध्ये प्रतिनिधी स्तरावर ही त्यांची पहिली द्विपक्षीय बैठक होती. वर्षभरात,EAM यांनी परराष्ट्र मंत्री वांग यी यांची तीन वेळा भेट घेतली- जुलैमध्ये एससीओ काउन्सिल ऑफ स्टेट मीटिंग दरम्यान, जुलैमध्ये व्हिएतनाममध्ये आसियानशी संबंधित परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीदरम्यान आणि नोव्हेंबरमध्ये जी20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर रिओ दी जनेरो येथे डिसेंबरमध्ये दोन देशांच्या विशेष प्रतिनिधींनी बीजिंग मध्येही भेट घेतली.



ऑक्टोबर 2024 मध्ये लाओस येथे झालेल्या भारत-आसियान शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांची जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्याशी द्विपक्षीय बैठक झाली.

अनेक उच्च-स्तरीय देवाणघेवाण आणि द्विपक्षीय संवाद यंत्रणेमुळे भारत आणि कोरिया प्रजासत्ताक (RoK) दरम्यान विशेष धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ होत गेली. ऑक्टोबरमध्ये व्हिएतनाम येथे झालेल्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या आणि नोव्हेंबरमध्ये रिओ दि जनेरो येथे झालेल्या G-20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि कोरियाचे तत्कालीन अध्यक्ष यून सुक येओल यांची भेट झाली. स्वतंत्रपणे, EAM ने मार्चमध्ये सोलला भेट दिली आणि परराष्ट्र मंत्री चो ताई-युल यांच्यासह 10व्या भारत-RoK संयुक्त आयोगाच्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषविले. दोन्ही मंत्र्यांची जुलैमध्ये आसियान प्रादेशिक मंचाच्या पार्श्वभूमीवर आणि पुन्हा सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्क मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या 79 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर आणि डिसेंबरमध्ये इटलीमध्ये झालेल्या G7 शिखर परिषदेत भेट झाली.

भारत आणि उत्तर कोरिया यांच्यातील संबंध स्थिर राहिले. संवाद आणि राजनैतिक मार्गांनी कोरियन द्वीपकल्पात शांतता आणि स्थैर्य आणण्याच्या प्रयत्नांना भारत सातत्याने पाठिंबा देत आहे.

भारत आणि मंगोलिया यांच्यात सभ्यतेचे, ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि आध्यात्मिक संबंध आहेत. मंगोलिया हा देश, चीन आणि रशियाच्या सीमेला लागून असलेला असल्याने, भारताला एक महत्त्वाचा 'तिसरा' आणि 'आध्यात्मिक शेजारी' म्हणून मानतो. संबंधांमध्ये विकास भागीदारी हा एक विशेष महत्त्वाचा घटक आहे.




"पंतप्रधानांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी ऑक्टोबर 2024 मध्ये कझान येथे 16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली"

उच्च-स्तरीय भेटींचे आदानप्रदान, व्यापार आणि गुंतवणूकीत वाढ आणि ऊर्जा, सुरक्षा, संरक्षण, अणुऊर्जा, संस्कृती, शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य आणि अन्न सुरक्षा यासह विविध क्षेत्रांमध्ये संबंध विस्तार यामुळे वर्षभरात भारताचे आखाती देशांशी संबंध बळकट आणि दृढ झाले. आखाती देश भारताच्या प्रमुख व्यापारी भागीदारांपैकी एक राहिले. 2023-24 मध्ये, USD 162 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त द्विपक्षीय व्यापारासह, गल्फ कोऑपरेशन कौन्सिल (GCC), भारताचा प्रमुख प्रादेशिक व्यापार भागीदार म्हणून उदयास आला. भारतात गुंतवणूकीचा ओघही मजबूत राहिला आणि या प्रदेशातून भारताची ऊर्जा आयात देखील लक्षणीय राहिली. जानेवारीमध्ये अहमदाबाद येथे झालेल्या व्हायब्रंट गुजरात शिखर परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी भारताला भेट दिली. या भेटीदरम्यान नाविन्यपूर्ण आरोग्यसेवा प्रकल्प, अक्षय ऊर्जा आणि फूड पार्कच्या विकासात गुंतवणूक सहकार्याबाबत सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली.

फेब्रुवारी 2024 मध्ये पंतप्रधानांनी संयुक्त अरब अमिरात (यूएई) ला द्विपक्षीय भेट दिली आणि यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान आणि दुबईचे शासक शेख मोहम्मद बिन रशीद अल मकतूम यांच्याशी चर्चा केली. या भेटीदरम्यान द्विपक्षीय गुंतवणूक करार, भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (IMEC) वर आंतर-सरकारी चौकट करार (IGFA), डिजिटल पायाभूत सुविधा प्रकल्प आणि राष्ट्रीय सागरी वारसा संकुल (NMHC) यावरील सामंजस्य करार यासह महत्त्वाच्या सामंजस्य

करारांवर/करार पत्रांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पंतप्रधानांनी फेब्रुवारीमध्ये अबू धाबीमधील पहिले हिंदू मंदिर, बीएपीएस मंदिराचे उद्‌घाटन केले.




(डावीकडून उजवीकडे) पंतप्रधानांनी संयुक्त अरब अमिरात मध्ये 'अहलान मोदी' (फेब्रुवारी) आणि कुवेत मध्ये 'हाला मोदी' (डिसेंबर) येथे भारतीय समुदायाला संबोधित केले).

नोव्हेंबरमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या दुबई कॅम्पसचे उद्‌घाटन केले. डिसेंबरमध्ये चौथ्या धोरणात्मक संवाद आणि 15व्या संयुक्त आयोगाच्या बैठकीसाठी संयुक्त अरब अमिरातीचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान यांनी भारताला भेट दिली.

सप्टेंबरमध्ये भारत-GCC च्या पहिल्याच संयुक्त मंत्रीस्तरीय धोरणात्मक संवाद बैठकीत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी रियाधला भेट दिली. भारत आणि गल्फ कोऑपरेशन कौन्सिल (GCC) सदस्य देश यांच्यामधील परराष्ट्र मंत्री स्तरावर ही पहिलीच बैठक होती. जूनमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी, कतारचे पंतप्रधान शेख मोहम्मद बिन अब्दुल रहमान बिन जसीम अल थानी जे परराष्ट्र मंत्री म्हणूनही काम पाहतात यांच्याशी द्विपक्षीय बैठकीसाठी दोहा येथे भेट दिली. डिसेंबरमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्री दोहा फोरमच्या 22 व्या आवृत्तीत सहभाग झाले आणि 'नवीन युगातील संघर्ष निराकरण' या विषयावर पॅनेलला संबोधित केले.

ऑगस्टमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी कुवेतला भेट दिली आणि त्यांनी युवराज शेख सबाह अल-खालिद अल सबाह, पंतप्रधान शेख अहमद अल अब्दुल्ला अल सबाह आणि परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला अली अल याहया यांची भेट घेतली. डिसेंबरमध्ये कुवेत च्या परराष्ट्र मंत्र्यांनीही भारताला भेट दिली आणि परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा केली आणि पंतप्रधानांची भेट घेतली.

2024 मध्ये भारताने विविध राजनैतिक, संरक्षण आणि मानवतावादी उपक्रमांद्वारे पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिकन राष्ट्रांसोबतचे द्विपक्षीय संबंध लक्षणीयरीत्या मजबूत केले. महत्त्वाचे ठळक मुद्दे म्हणजे सन्माननीय राष्ट्रपतीजींचा अल्जीरिया येथे ऐतिहासिक दौरा, जो भारतीय राष्ट्र प्रमुखांचा पहिला दौरा आहे आणि भारत-अल्जीरिया आर्थिक मंचाचे उद्‌घाटन यांचा यामध्ये समावेश आहे. उच्च-स्तरीय भेटी

आणि लष्करी सहकार्य कराराद्वारे अल्जेरिया सोबत संरक्षण सहकार्य आणखी मजबूत झाले. भारताने इजिप्त, इस्रायल आणि मोरोक्को सोबतही आपले संबंध दृढ केले, ज्यामध्ये संरक्षण सहकार्यापासून ते आर्थिक आदानप्रदान आणि धोरणात्मक संवादापर्यंतचे संबंध समाविष्ट आहेत. भारताने जुलैमध्ये त्रिपोली येथे आपला पहिला दूतावास कार्यान्वित केला.

भारताची पॅलेस्टाईन ला मानवतावादी दृष्टीकोनातून केलेली मदत, ज्यामध्ये वैद्यकीय मदतीचे महत्त्वपूर्ण योगदान समाविष्ट आहे. भारताने 2024-25 या वर्षासाठी संयुक्त राष्ट्रांच्या मदत आणि कार्य एजन्सीला पूर्व (UNRWA) मधील पॅलेस्टाईन निर्वासित यांच्या साठी USD 5 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे वार्षिक योगदान दिले. गेल्या काही वर्षांत, भारताने UNRWA च्या शिक्षण, आरोग्यसेवा आणि मदत सेवांसह मुख्य उपक्रमांमध्ये एकूण USD 40 दशलक्ष योगदान दिले आहे. याव्यतिरिक्त, सुदान, सिरिया आणि दक्षिण सुदानमध्ये वैद्यकीय आणि शैक्षणिक पोहोच सुरूच ठेवली. लिबिया, ट्युनिशिया आणि जिबूती यांच्यासोबत वर्षभर राजनैतिक भेटी आणि सहकार्य वृद्धिंगत करण्यात आले, तसेच भारत प्रादेशिक मानवी प्रयत्नांमध्ये सक्रिय भूमिका बजावत आहे.

याव्यतिरिक्त, जॉर्डन आणि सोमालिया सोबत भारताच्या सहभागाने संरक्षण आणि व्यवसाय क्षेत्रात सहकार्य दिसून आले. या वर्षात शैक्षणिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू राहिली, ज्यामुळे संपूर्ण प्रदेशात संबंध अधिक दृढ करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली.

भारत आणि इराण यांच्यातील द्विपक्षीय सहकार्याने वर्षभरात आपली सकारात्मक गती कायम ठेवली. ऑक्टोबरमध्ये, रशियातील कझान येथे झालेल्या 16व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी इराणचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण पैलूंचा आढावा घेतला आणि पश्चिम आशियातील परिस्थितीसह प्रादेशिक घडामोडींवर चर्चा केली. जानेवारीमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी इराणला जाऊन तत्कालीन राष्ट्रपती सय्यद इब्राहिम रईसी यांचा भेट घेतली. या भेटीदरम्यान, त्यांनी तत्कालीन परराष्ट्र व्यवहार मंत्री हुसेन अमिराब दोल्लाहियान, रस्ते व शहरी विकास मंत्री मेहरदाद बाझ्रपाश आणि सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली अकबर अहमदियान यांचीही भेट घेतली. त्याच महिन्यात, कंपाला येथे झालेल्या NAM शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी, तत्कालीन पहिले उपराष्ट्रपती मोहम्मद मोखबर यांची भेट घेतली. ऑक्टोबरमध्ये, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी कझान येथे ब्रिक्स आऊटरीच सत्रादरम्यान इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरघची यांची भेट घेतली. वर्षभरात संपर्क प्रकल्पांमध्ये सहकार्याला आणखी बळकटी देण्यात आली. चाबहार बंदराच्या शाहिद बेहेश्ती टर्मिनलला सुसज्ज करण्यासाठी आणि चालवण्यासाठी 13 मे रोजी इंडिया पोर्ट्स ग्लोबल लिमिटेड आणि इराणच्या पोर्ट अँड मेरिटाईम ऑर्गनायझेशन यांच्यात दीर्घकालीन मुख्य करार झाला.

रशियाच्या अध्यक्षतेखाली 16th ब्रिक्स शिखर परिषद ऑक्टोबरमध्ये रशियाच्या कझान येथे आयोजित करण्यात आली होती. शिखर परिषदेचा विषय "न्याय्य जागतिक विकास आणि सुरक्षेसाठी बहुपक्षीयता बळकट करणे" असा होता. जूनमध्ये, रशियाने निझनी नोवगोरोड येथे ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांची बैठक आयोजित केली होती, ज्यामध्ये 'विकसनशील देशांसोबत ब्रिक्स संवाद' या विषयावर मंत्रालयीन सत्र आयोजित करण्यात आले होते. या बैठकीत सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री राजपुत्र फैसल बिन फरहान यांचा सहभाग होता. सप्टेंबरच्या सुरुवातीला, न्यू यॉर्क मध्ये 79 व्या UNGA च्या पार्श्वभूमीवर झालेल्या ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी देशाचे प्रतिनिधित्व केले. ऑक्टोबरमध्ये

झालेल्या शिखर परिषदेदरम्यान, पंतप्रधानांनी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले, तर परराष्ट्र व्यवहार मंत्री BRICS  प्लस/आऊटरीच सत्रात सहभागी झाले होते.  शिखर परिषदेचा समारोप 16 व्या BRICS कझान जाहिरनामा स्वीकारून आणि 'संभाव्य ब्रिक्स भागीदार देशांची यादी' यासह 'ब्रिक्स भागीदार देशांच्या श्रेणीच्या पद्धती' याला अंतिम स्वरूप देऊन झाला.

SCO मध्ये भारताचे प्राधान्यक्रम पंतप्रधानांच्या 'सुरक्षित' SCO च्या दृष्टिकोनातून आकारले जातात, ज्यामध्ये SECURE  म्हणजे सुरक्षा, आर्थिक विकास, कनेक्टिव्हिटी, एकता,सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर आणि पर्यावरणीय संरक्षण होय.  भारत SCO चौकटीत विविध यंत्रणा/उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी राहिला आणि सार्वभौमत्व, स्वातंत्र्य, प्रादेशिक अखंडता, समानता, परस्पर लाभ आणि अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचा परस्पर आदराचा पुनरुच्चार केला.  जुलैमध्ये अस्ताना येथे झालेल्या 24व्या SCO शिखर परिषदेत परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले आणि SCO राष्ट्र प्रमुखांच्या परिषदेच्या विस्तारित स्वरूपात झालेल्या बैठकीत पंतप्रधानांच्या विचार व्यक्त केले.




ऑक्टोबर 2024 मध्ये, कझान येथे झालेल्या 16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान सहभागी झाले होते



ऑक्टोबरमध्ये इस्लामाबाद येथे झालेल्या सरकार प्रमुखांच्या परिषदेच्या (CHG) बैठकीतही परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. अस्थाना जाहीरनामा याशिवाय SCO शिखर परिषदेत एकूण 23 दस्तऐवज स्वीकारण्यात आले. या जाहीरनाम्यात, या प्रदेशात वाहतूक आणि कनेक्टिव्हिटी उपक्रमांचे स्वागत करताना, आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार, संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर आणि एससीओ चार्टर ची उद्दिष्टे आणि तत्त्वे यांच्यानुसार निष्पक्ष आणि संतुलित आधारावर सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले गेले. याशिवाय, जाहीरनाम्यात दहशतवादाचा निषेध करण्यात आला आहे, विशेषतः दहशतवाद्यांना वित्तपुरवठा आणि दहशतवाद्यांच्या सीमापार हालचालींच्या मुद्द्यांना सोडवण्याच्या गरजेवर तसेच दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या आणि सुरक्षा प्रदान करणाऱ्या देशांना वेगळे पाडणे आणि उघडे पाडणे यावर भर देण्यात आला आहे.

भारत-युक्रेन द्विपक्षीय संबंध विकसित होत राहिले. ऑगस्टमध्ये, पंतप्रधानांनी युक्रेन येथे ऐतिहासिक भेट दिली, जी एका भारतीय पंतप्रधानांनी दिलेली पहिलीच भेट होती. पंतप्रधानांनी, जूनमध्ये इटलीत झालेल्या G7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर आणि सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्क मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या 79 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर युक्रेन चे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची देखील भेट घेतली. मार्चमध्ये परराष्ट्रमंत्र्यांच्या निमंत्रणावरून युक्रेनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी नवी दिल्लीला औपचारिक भेट दिली.

बेलारूस प्रजासत्ताकाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई अलैनिक यांनी मार्चमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांच्या निमंत्रणावरून भारताला भेट दिली. दोन्ही मंत्र्यांनी भारत-बेलारूस द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला आणि व्यापार, अर्थव्यवस्था, विमा, संरक्षण, शिक्षण, माहिती तंत्रज्ञान आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये विकास भागीदारी आणि द्विपक्षीय सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या मार्गांवर चर्चा केली.

सप्टेंबरमध्ये, MoS (KVS) यांनी आर्मेनिया येथे भेट दिली आणि येरेवन संवादाच्या उद्घाटनाला उपस्थित राहिले, हा ट्रॅक 1.5 संवाद होता ज्यामध्ये मंत्री, राजदूत, थिंक-टँक (विचारगट) आणि शिक्षणतज्ज्ञांचा सहभाग होता. त्यांनी अर्मेनियाचे उप पंतप्रधान मेहर हर्बर्टी ग्रिगोरियन यांची भेट घेतली आणि अर्मेनियाचे परराष्ट्र मंत्री अरारत मिर्जोयान यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली.

वर्षभरात, उच्च-स्तरीय राजनैतिक भेटी, व्यापार विस्तार आणि विकास भागीदारींना प्रोत्साहन देऊन भारताचे आफ्रिकन देशांसह संबंध लक्षणीय होते. माननीय राष्ट्रपती जी यांनी ऑक्टोबरमध्ये मलावी आणि मॉरिटानिया येथे महत्त्वपूर्ण भेटी दिल्या. या भेटीदरम्यान, माननीय राष्ट्रपतीजी यांनी आफ्रिकन नेत्यांशी संवाद साधून द्विपक्षीय आणि आर्थिक संबंध मजबूत केले.

ऑगस्टमध्ये, 19 व्या CII इंडिया-आफ्रिका कॉन्क्लेव्हमध्ये सहभागी होण्यासाठी बुरुंडी, द गॅम्बिया, लायबेरिया, मॉरिशस आणि झिम्बाब्वेच्या उपराष्ट्रपतींसह अनेक आफ्रिकन नेत्यांनी भारताला भेट दिली. त्याच महिन्यात, व्हॉईस ऑफ ग्लोबल साउथ समिटच्या 3 ऱ्या आवृत्तीत अल्जेरिया, अंगोला, बेनिन, बोत्सवाना, बुर्किना फासो, बुरुंडी, केप वर्दे, चाड, कोमोरोस, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, इजिप्त, इक्वेटोरियल गिनी, एरिटिया, एरिट्रिया, एस्वातीनी, इथिओपिया, गेबॉन, गॅम्बिया, घाना, गिनिया, गिनिया बिसाउ, आयव्हरी कोस्ट, केनया, लेसोथो, लायबेरिया, लिबया, मडगास्कर, मालावी,

माली, मॉरिटानिया, मॉरिशिस, मोरोक्को, मोझाम्बिक, नामिबिया, नायगर, नायजेरिया, रवांडा, साओ तोमे ऍण्ड प्रिन्सिपे, सेनेगल, सेशेल्स, सिएरा लिओने, सोमालिया, दक्षिण आफ्रिका, दक्षिण सुदान, सुदान, टांझानिया, टोगो, ट्युनिशिया, उगांडा, झांबिया, आणि झिम्बाब्वे.

पंतप्रधानांनी जानेवारीमध्ये गांधीनगर येथे मोझांबिकचे राष्ट्राध्यक्ष फिलिप न्युसी यांची भेट घेतली आणि द्विपक्षीय संबंध आणि प्रादेशिक सुरक्षेवर चर्चा केली. पंतप्रधानांनी नोव्हेंबरमध्ये नायजेरिया येथे औपचारिक भेट दिली. जी एखाद्या भारतीय पंतप्रधानांची 17 वर्षांतील पहिली भेट ठरली. या भेटीत सीमाशुल्क सहकार्य, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि जमीन सर्वेक्षण सहकार्याबाबत सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आल्या. नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांनी पंतप्रधानांना "ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ नायजर" हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला.

EAM ने UNGA च्या 74 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्क येथे इथिओपियाचे परराष्ट्र मंत्री ताये अत्स्के सेलासी यांच्याशी, जानेवारीमध्ये कंपाला येथे NAM शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर युगांडाचे परराष्ट्र मंत्री जेजे ओडोंगो यांच्याशी आणि फेब्रुवारीमध्ये दिल्लीमधील रायसीना संवादाच्या पार्श्वभूमीवर घाना चे परराष्ट्र मंत्री शर्ली अयोर्कोर बॉचवे यांच्या सोबत स्वतंत्र बैठकांमध्ये सहभाग घेतला.



नोव्हेंबर 2024 मध्ये अबुजा येथे नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांच्या हस्ते पंतप्रधानांना 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ नायजर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गेबॉन आणि काबो व्हर्दे येथे नवीन दूतावास उघडून भारताने आफ्रिकेत आपला राजनैतिक प्रभाव क्षेत्राचा विस्तार केला. भारताच्या पाठिंब्याने इथिओपिया जानेवारीत ब्रिक्स मध्ये सामील झाला आणि भारत USD 7.9 दशलक्ष द्विपक्षीय व्यापारासह आफ्रिकेतील टांझानियाचा दुसरा सर्वात मोठा व्यापार भागीदार बनला. शिवाय, भारताने रवांडाला मिडवाइफरी विकासासाठी 1 दशलक्ष डॉलर्सचे अनुदान

सहाय्य प्रदान केले, मलावी मध्ये कायमस्वरूपी कृत्रिम अवयव फिटमेंट सेंटर स्थापन करण्यास मदत केली आणि मोझांबिक येथे दोन फास्ट इंटरसेप्टर क्राफ्ट्स (FICs) दान केले.

संरक्षणाशी संबंधित प्रमुख उपक्रमांमध्ये, INS तलवार ने केनिया (सप्टेंबर), टांझानिया (ऑक्टोबर) आणि दक्षिण आफ्रिका (ऑक्टोबर) येथे पोर्ट कॉल आणि मार्चमध्ये उत्तर मोझांबिक मधील नाकाला येथे पहिला भारत-मोझांबिक-टांझानिया त्रिपक्षीय नौदल सराव आयोजित करणे यांचा समावेश होता.

आफ्रिकेतील प्रमुख विकास उपक्रमांमध्ये घानाच्या टेमा-पाकादान रेल्वे मार्गासाठी USD 447 दशलक्ष निधी, एक्झिम बँकेचे (निर्यात-आयात बँक ऑफ इंडिया) केनिया येथे नवीन पूर्व आफ्रिका प्रतिनिधी कार्यालय उघडणे आणि नामिबिया आणि टोगो मध्ये डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी करारांवर स्वाक्षरी करणे यांचा समावेश होता. मानवतेच्या आघाडीवर, भारताने नामिबिया, केनिया आणि झांबिया ला दुष्काळ आणि पूर निवारणासाठी मदत केली, तसेच कॉलरा उद्रेकाचा सामना करण्यासाठी झांबिया मध्ये 3.5 टन वैद्यकीय साहित्य पुरवले. वर्षभर क्षमता बांधणीचे प्रयत्न सुरू राहिले, पूर्व आणि दक्षिण आफ्रिकेला 1,800 पेक्षा जास्त ITEC प्रशिक्षण स्लॉट्स, मध्य आणि पश्चिम आफ्रिकेसाठी 1,272 ITEC स्लॉट्स आणि 251 ICCR शिष्यवृत्ती आणि ई-विद्याभारती आरोग्यभारती (e-VBAB) ऑनलाइन शिक्षण कार्यक्रमात 7,600 आफ्रिकन विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. हे उपक्रम व्यापार, संरक्षण आणि विकास सहकार्याद्वारे आफ्रिकेसाठी भारताची वाढती वचनबद्धता अधोरेखित करतात. वर्षभरात, भारत आणि लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन (LAC) प्रदेशातील राजकीय सहभागामुळे या प्रदेशातील देशांसोबतच्या आपल्या संबंधांना आणखी एक नवीन गती मिळाली आहे.

नोव्हेंबरमध्ये रिओ दि जानेरो येथे झालेल्या G20 नेत्यांच्या शिखर परिषदेसाठी पंतप्रधानांनी ब्राझील येथे भेट दिली. G-20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा, अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष जेवियर मिलेई आणि चिलीचे राष्ट्राध्यक्ष गॅब्रिएल बोरिक फाँट यांची स्वतंत्रपणे भेट घेतली.

नोव्हेंबरमध्ये, पंतप्रधानांनी गयाना येथे औपचारिक भेट देखील दिली, जिथे त्यांनी गयाना चे अध्यक्ष मोहम्मद इरफान अली यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. जॉर्ज टाऊन येथील स्टेट हाऊसमध्ये झालेल्या समारंभात, पंतप्रधानांना गयाना च्या राष्ट्रपतींनी गयाना चा सर्वोच्च पुरस्कार, "ऑर्डर ऑफ द एक्सलन्स" प्रदान केला.

पंतप्रधानांनी जॉर्जटाउन, गयाना येथे ग्रेनेडा चे पंतप्रधान डिकॉन मिशेल यांच्यासमवेत 2 ऱ्या इंडिया-कॅरिबियन कम्युनिटी (CARICOM) शिखर परिषदेचे सहअध्यक्षपद देखील भूषवले. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधानांनी अँटिग्वा आणि बार्बुडा, बार्बाडोस, सेंट लुसिया, कॉमनवेल्थ ऑफ डोमिनिका, ग्रेनाडा, त्रिनिदाद आणि टोबॅगो आणि सुरीनाम यांच्या पंतप्रधानांसोबत द्विपक्षीय बैठका घेतल्या. जॉर्जटाउन येथे झालेल्या समारंभात, डोमिनिका कॉमनवेल्थ च्या राष्ट्राध्यक्षा सिल्व्हानी बर्टन यांनी पंतप्रधानांना "डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर" हा डोमिनिका चा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला.

या वर्षी कॅरिबियन राष्ट्रांच्या नेत्यांनी देखील भेटी दिल्या. फेब्रुवारीमध्ये गयाना चे पंतप्रधान मोहम्मद इरफान अली यांनी भारताला भेट दिली. त्यांनी माननीय राष्ट्रपती जी आणि माननीय उपराष्ट्रपती यांची भेट घेतली आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि ऊर्जा आणि नवीकरणीय व अक्षय ऊर्जा मंत्री यांच्याशी स्वतंत्रपणे बैठका घेतल्या. मे महिन्यात त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या पंतप्रधानांनी मुंबई आणि जामनगर

येथे भेट दिली. जमैका मधील पंतप्रधानांनी ऑक्टोबरमध्ये भारताला भेट दिली आणि माननीय राष्ट्रपती जी, माननीय उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्याशी स्वतंत्र बैठका घेतल्या. व्हेनेझुएला च्या कार्यकारी उपराष्ट्रपतींनी ऑक्टोबरमध्ये भारतामध्ये एका शिष्टमंडळाचे नेतृत्व केले आणि माननीय उपराष्ट्रपती आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री यांची भेट घेतली.

वर्षभरात, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी पनामा, ब्राझील, चिली, अर्जेंटिना आणि सेंट किट्स आणि नेव्हिस येथील परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली. त्यांनी न्यू यॉर्क मधील UNGA च्या पार्श्वभूमीवर गयाना, बोलिव्हिया, मेक्सिको, क्युबा, एल साल्वाडोर, निकाराग्वा, पनामा, डोमिनिका, ग्रेनाडा, त्रिनिदाद व टोबॅगो, सुरीनाम आणि व्हेनेझुएला येथील त्यांच्या सहकाऱ्यांची तसेच सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स येथील पंतप्रधानांची भेट घेतली. कंपाला येथे झालेल्या NAM शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी युगांडा येथे कोलंबिया, बोलिव्हिया आणि व्हेनेझुएला येथील परराष्ट्र मंत्र्यांशी स्वतंत्रपणे भेट घेतली.

नोव्हेंबरमध्ये गयाना येथे झालेल्या भारत-कॅरिकॉम शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी जमैकाचे परराष्ट्र मंत्र्यांची आणि डिसेंबरमध्ये कतार येथील दोहा फोरमच्या पार्श्वभूमीवर होंडुरासच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली.



(वरती डावीकडून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने) नोव्हेंबर 2024 मध्ये जॉर्ज टाऊन येथे झालेल्या 2 ऱ्या भारत-कॅरिकॉम शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी अँटिग्वा आणि बर्बुडा, बहामास, बार्बाडोस, डोमिनिका, सेंट लुसिया आणि त्रिनिदाद व टोबॅगो नेतृत्वाशी संवाद साधला.

फेब्रुवारी 2024 मध्ये G20 परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीसाठी MOS (VM) ने ब्राझील येथे भेट दिली. ऑगस्टमध्ये, MOS (PM) यांनी डोमिनिकन रिपब्लिक, ग्वाटेमाला, एल साल्वाडोर, पनामा आणि त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे अधिकृत भेटी दिल्या. त्यानंतर, त्यांनी मेक्सिको (सप्टेंबर), ग्रेनाडा (ऑक्टोबर), बार्बाडोस (ऑक्टोबर) आणि अँटिग्वा आणि बार्बुडा (ऑक्टोबर) येथे भेटी दिल्या. MOS (KVS) यांनी ऑक्टोबरमध्ये COP16 बैठकीत सहभागी होण्यासाठी कॅली, कोलंबिया येथे भेट दिली. सप्टेंबरमध्ये ला पाझ, बोलिव्हिया येथे नवीन मिशन सुरूवातीसह, LAC प्रदेशात भारताची आता 17 निवासी मिशन आहेत.



(वरती डावीकडून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने) सप्टेंबर 2024 मध्ये न्यू यॉर्क येथे झालेल्या UNGA च्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्री क्युबा, एल साल्वाडोर, गयाना आणि व्हेनेझुएला मधील त्यांच्या सहकाऱ्यांना भेटले.

संयुक्त राष्ट्रांचा सदस्य म्हणून भारत सक्रियपणे सहभागी होत राहिला आणि बहुपक्षीयतेचा पुरस्कार करण्यात आणि जागतिक व्यवस्थेत सुधारणा करण्यात आघाडीची भूमिका बजावत राहिला. जानेवारीमध्ये, संयुक्त राष्ट्र महासभेच्या अध्यक्षांनी माननीय राष्ट्रपती जी यांची भेट घेतली आणि परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांसोबत स्वतंत्र बैठक घेतली. जुलैमध्ये, पंतप्रधानांनी नवी दिल्ली येथे संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (युनेस्को) च्या जागतिक वारसा समितीच्या 46 व्या सत्राच्या बैठकीला संबोधित केले. भारताने आयोजित केलेले युनेस्कोचे हे पहिलेच सत्र होते.

भारत नोव्हेंबरमध्ये बाकू, अझरबैजान येथे झालेल्या युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज (UNFCCC) च्या 29 कॉन्फरन्स ऑफ पार्टीज (COP29) मध्ये सहभागी झाला.

सप्टेंबरमध्ये, पंतप्रधानांनी न्यू यॉर्क मधील संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत 'समिट ऑफ द फ्यूचर' येथे संबोधित केले. शिखर परिषदेने पाच क्षेत्रांमध्ये 56 कृती मुद्द्यांसह "भविष्यासाठी करार (पॅक्ट फॉर द फ्यूचर)" स्वीकारला. पंतप्रधानांनी नेपाळचे पंतप्रधान, कुवेत चे युवराज, पॅलेस्टाईन राज्याचे राष्ट्राध्यक्ष, व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष आणि युक्रेन चे राष्ट्राध्यक्ष यांच्यासह अनेक नेत्यांसोबत स्वतंत्र द्विपक्षीय बैठका घेतल्या. स्वतंत्रपणे, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी UNGA च्या 79 व्या अधिवेशनात उच्च-स्तरीय आठवड्यासाठी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले आणि 28 सप्टेंबर रोजी न्यू यॉर्क येथे 79 व्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या उच्च-स्तरीय विभागाच्या सर्वसाधारण चर्चेला संबोधित केले.

UNGA सत्राच्या पार्श्वभूमीवर, EAM ने G20, G4, IBSA, BRICS, L-69 & C-10, इंडिया-CARICOM, इंडिया-CELAC आणि BIMSTEC. यासह विविध बहुपक्षीय परराष्ट्र मंत्री-स्तरीय बैठकांमध्ये सहभागी झाले.

भारताने आपल्या भागीदार देशांच्या गरजांनुसार प्रकल्प, अनुदान आणि कर्जे यांच्या माध्यमातून विकास सहाय्य प्रदान केले आहे. गेल्या काही वर्षांत, त्याची व्याप्ती तांत्रिक सल्लागार, आपत्ती निवारण,

मानवतावादी मदत, वारसा पुनर्संचयित करणे, शिक्षण शिष्यवृत्ती, क्षमता बांधणी कार्यक्रम, पायाभूत सुविधा, जलविद्युत, वीज प्रसारण, कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पुरातत्व संवर्धन आणि सीमापार कनेक्टिव्हिटी मजबूत करणे या क्षेत्रातील नागरी आणि लष्करी अभ्यासक्रम यापर्यंत विस्तारली आहे. प्रमुख विकास सहकार्य प्रकल्पांमध्ये शिक्षण, आरोग्य, कृषी, पाणी, ऊर्जा आणि कनेक्टिव्हिटी यासह विविध क्षेत्रांचा समावेश आहे. भारत LOC देखील देते, म्हणजे भागीदार देशांना सवलतीच्या दरात कर्जे दिली जातात. पूर्ण झालेल्या प्रमुख LOC प्रकल्पांमध्ये बुरुंडी मधील काबू येथे 20 मेगावॅट चा जलविद्युत प्रकल्प, झिम्बाब्वे आणि टांझानिया मधील पाणीपुरवठा प्रणालींचे अपग्रेडेशन, श्रीलंकेतील रेल्वे ट्रॅक अपग्रेडेशन प्रकल्प आणि गयाना ला विमान पुरवठा यांचा समावेश आहे. या वर्षी मॉरिशसमध्ये पाणी पाईपलाईन बदलण्याच्या प्रकल्पासाठी पहिल्यांदाच रुपये नामांकित LOC देण्यात आला. विदेशी सरकारी व्यावसायिकांसाठी विविध नाविन्यपूर्ण प्रशिक्षण अभ्यासक्रमांची विस्तृत श्रेणी प्रदान करून भारत आपल्या भागीदार देशांसाठी क्षमता बांधणीला प्रोत्साहन देतो. वर्षभरात नागरी 13,500 पेक्षा जास्त प्रशिक्षण स्लॉट्स देण्यात आले, नागरी मध्ये (10,200 स्लॉट्स) आणि संरक्षण अभ्यासक्रमांमध्ये (3,300+ स्लॉट्स) , ज्याद्वारे नागरी अभ्यासक्रमांसह 115 पेक्षा जास्त देशांमध्ये आणि संरक्षण-संबंधित अभ्यासक्रमांसाठी जवळपास 80 देशांमध्ये पोहोचले.



सप्टेंबर 2024 मध्ये न्यू यॉर्क येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या फ्यूचर समिटमध्ये पंतप्रधानांनी आपले विचार व्यक्त केले




सप्टेंबर 2024 मध्ये न्यू यॉर्क येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या 79 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र व्यवहार मंत्री L-69 गटाच्या संयुक्त मंत्रीस्तरीय बैठकीत सहभागी झाले.




नोव्हेंबर 2024 मध्ये गयाना येथील लष्करी पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणासाठी USD 23.37 दशलक्ष डिफेन्स लाईन ऑफ क्रेडिट (LoC) चा भाग म्हणून भारताने दोन डॉर्नियर HAL-228 विमाने सुपूर्द केली

भारताने स्थलांतर धोरण, कल्याण आणि परदेशस्थ प्रतिबद्धतेत लक्षणीय प्रगती केली आहे. डेन्मार्क, इस्रायल, मलेशिया, तैवान आणि यूके यांच्यासोबत स्थलांतर आणि गमनशीलता भागीदारी करार (MMPA) आणि कामगार गमनशीलता करार (LMA) यासह अनेक करारांद्वारे सरकारने सुरक्षित आणि कायदेशीर स्थलांतराला सक्रियपणे प्रोत्साहन दिले.

कामगार गमनशीलता आणि रोजगार मार्ग सुलभ करण्यासाठी UK आणि इटली सोबत संयुक्त कार्यकारी गट बैठक आयोजित केली गेली. अबू धाबी संवाद, बुडापेस्ट प्रक्रिया, कोलंबो प्रक्रिया आणि स्थलांतर आणि गमनशीलता वरील भारत-यूरोपियन उच्च-स्तरीय संवाद (HLDMM) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्य केल्याने जागतिक स्थलांतर प्रशासनात भारताची भूमिका बळकट झाली. भारताने 2024-26 साठी कोलंबो प्रक्रियेची अध्यक्षता केली आणि अबू धाबी संवादाच्या सल्लागार समितीत सामील झाला. भारतीय समुदाय कल्याण निधी (ICWF) अंतर्गत परदेशात 3.5 लाखांहून अधिक भारतीय कामगारांना मदत करण्यासाठी आणि भारतीय स्थलांतरित कामगारांचे सॉफ्ट स्किल्स वाढवण्याच्या उद्देशाने निर्गमन-पूर्व अभिमुखता प्रशिक्षण वाढविण्यासाठी सरकारने कल्याणकारी योजनांचा विस्तार केला. इमिग्रेशन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी डिजिलॉकर इंटिग्रेशन, तक्रार निवारण आणि ई-व्हेरिफिकेशन सारख्या वैशिष्ट्यांसह सुधारित eMigrate V2.0 पोर्टल आणि मोबाइल ॲप सुरू करण्यात आले. सरकारद्वारे विद्यार्थ्यांच्या समस्या, अनिवासी भारतीय महिलांसाठी वैवाहिक वाद सोडवणे आणि प्रवासी भारतीय विमा योजना (PBBY), नो इंडिया प्रोग्राम (KIP) आणि विदेश संपर्क कार्यक्रम यासारख्या उपक्रमांद्वारे देशांतरित जन समूह यावर देखील लक्ष केंद्रित करण्यात आले.

वर्षभरात, मंत्रालयाने ट्रॅक 1.5 आणि 2.0 संवाद यासारख्या अनेक परराष्ट्र धोरण आउटरीच उपक्रमांना चालना देण्यासाठी थिंक-टँक आणि शैक्षणिक संस्थांशी सहकार्य केले. मंत्रालयाने रायसीना संवाद,


रायसिना संवाद, आशियाई आर्थिक संवाद, हिंद महासागर परिषद, भारत-अमेरिका फोरम, भारत-जपान फोरम, भारत-नॉर्डिक संवाद आणि भारत-ईयू ट्रॅक 1.5 संवाद यासह प्रमुख परराष्ट्र धोरण आउटरीच संवाद देखील हाती घेतले. मंत्रालयाने जपान, फ्रान्स, नॉर्वे आणि ऑस्ट्रेलिया, जपान व अमेरिकेच्या क्वाड सदस्य-राज्यांसह संयुक्तपणे परराष्ट्र मंत्रालयांच्या समपदस्थ धोरण नियोजन विभाग/ब्युरोसह धोरण नियोजन संवाद देखील आयोजित केले. याच वर्षात पहिला त्रिपक्षीय भारत-जपान-कोरिया धोरण नियोजन संवाद देखील आयोजित करण्यात आला होता.

डिजिटल डिप्लोमसी, प्रादेशिक मीडिया सहभाग आणि प्रभावशाली सहकार्याद्वारे 2024 मध्ये भारताची बाह्य प्रसिद्धी आणि सार्वजनिक मुत्सद्देगिरी लक्षणीयरित्या वाढली. प्रमुख उपक्रमांमध्ये MEA WhatsApp चॅनेल सुरू करणे, सोशल मीडिया उपस्थिती वाढवणे, विदेशी पत्रकारांच्या भेटी सुलभ करणे, चित्रपट महोत्सव आयोजित करणे, माहितीपट तयार करणे आणि भारतीय संस्कृतीला प्रोत्साहन देणे यांचा समावेश होतो. इंडिया कॉर्नर्स, SAMEEP व्याख्याने आणि भारत को जानिए क्विझ द्वारे सार्वजनिक सहभाग वाढवला गेला.

वर्षभरात, भारताने लॅटविया, जॉर्जिया, गॅबोनीज प्रजासत्ताक आणि तिमोर-लेस्टे येथे नवीन राजनैतिक मिशन सुरू केले. मार्सेल (फ्रान्स), बार्सिलोना (स्पेन), ब्रिस्बेन (ऑस्ट्रेलिया) आणि ऑकलँड (न्यूझीलंड) येथील नवीन वाणिज्य दूतावास यांनीही त्यांचे कामकाज सुरू केले.



फेब्रुवारी 2024 मध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी आणि डेन्मार्कचे परराष्ट्र मंत्री लार्स लोके रास्मुझेन यांनी गमनशीलता आणि स्थलांतर भागीदारी करारावर स्वाक्षरी केली




मंत्रालयाने भारत-अमेरिका फोरम (नवी दिल्ली), जागतिक तंत्रज्ञान शिखर परिषदेतील इनोव्हेशन डायलॉग (बेंगळुरू), आशिया इकॉनॉमिक फोरम (पुणे), भारत-जपान फोरम (नवी दिल्ली), हिंद महासागर परिषद (पर्थ) आणि रायसीना संवाद (नवी दिल्ली) यासह अनेक परराष्ट्र धोरण आऊटरीच उपक्रमांना चालना देण्यासाठी थिंक-टँक आणि शैक्षणिक संस्थांशी सहकार्य साधले.




नोव्हेंबर 2024 मध्ये ब्रिस्बेन येथे भारताच्या नवीन वाणिज्य दूतावासाचे उद्‌घाटन परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि क्वीन्सलँड चे गव्हर्नर जेनेट यंग यांनी केले

सुषमा स्वराज इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन सर्व्हिसने मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी, इतर नागरी सेवांचे सदस्य आणि विदेशी राजदूत यांच्यासाठी अनेक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले. ग्लोबल साउथ यंग डिप्लोमॅट्स फोरम (GSYDF) ची 2 री आवृत्ती सप्टेंबरमध्ये ग्लोबल साउथच्या 29 देशांतील 32 राजदूतांच्या सहभागाने आयोजित करण्यात आली होती. 71 वा विदेशी राजदूतांसाठी व्यावसायिक

अभ्यासक्रम (PCFD) एप्रिल-मे दरम्यान आयोजित करण्यात आला होता ज्यामध्ये 30 देशांतील 34 राजदूतांनी सहभागा घेतला होता.




सप्टेंबर 2024 मध्ये सुषमा स्वराज इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन सर्व्हिस (SSIFS) येथे 2 रा ग्लोबल साउथ यंग डिप्लोमॅट्स फोरम (GSYDF) आयोजित करण्यात आला होता.

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (ICCR) ने सांस्कृतिक देवाणघेवाण आणि भारताच्या 'सॉफ्ट पॉवर'चा जागतिक प्रसार करण्यास प्रोत्साहन देणे सुरू ठेवले आहे. 2024-25 या शैक्षणिक वर्षात, ICCR ने 20 शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विदेशी नागरिकांना 3960 शिष्यवृत्तीच्या जागा उपलब्ध केल्या, ज्यामध्ये अफगाण नागरिकांसाठी ऑनलाइन पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम करण्यासाठी 1000 शिष्यवृत्त्यांचा समावेश आहे. ICCR ने भारतातील 62 सांस्कृतिक शिष्टमंडळांना जगभरातील देशांमध्ये प्रायोजित केले आणि विविध देशांमध्ये प्रतिष्ठित भारतीय नेत्यांच्या 9 अर्ध पुतळ्यांचे आणि पुतळ्यांच्या देण्याचे नियोजन केले. ICCR ने जगातील विविध भागात 38 भारतीय सांस्कृतिक केंद्रांना (ICCs) पाठिंबा देणे सुरू ठेवले आहे.



परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी जुलै 2024 रोजी जपानमधील टोकियो येथील भारतीय दूतावासात महात्मा गांधींच्या अर्ध पुतळ्याचे अनावरण केले.